मुंबई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

दैनिक **युवक आधार** मराठी

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले

● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : 3 ■ अंक : १२४ ■ रविवार, ११ जानेवारी २०२६ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514




# ईडीविरोधात ममतांचा एल्गार

## ■ दोन एफआयआर दाखल ■ तृणमूलची दिल्लीत निदर्शने ■ ईडीची कोलकाता उच्च न्यायालयात धाव

**दैनिक युवक आधार**

**नवी दिल्ली :** देशाच्या विविध राज्यांमध्ये असलेली विरोधी पक्षांची सरकारे अस्थिर करण्यासाठी केंद्र सरकार सक्तवसुली संचालनालयाचा (ईडी) गैरवापर करीत असल्याचा आरोप विरोधकांकडून सातत्याने केला जात असतानाच शुक्रवारी पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी राज्यात करण्यात आलेल्या ईडीच्या कारवाईविरोधात दंड थोपटले. दरम्यान, ईडीच्या कारवाईविरोधात दोन गुन्हे दाखल करण्यात आले असून कोलकाता ते दिल्लीपर्यंत विविध ठिकाणी तृणमूलतर्फे आंदोलने करण्यात आली.

आय-पॅकच्या संकुलांवर ईडीने केलेल्या छापेमारीचा उद्देश तृणमूल काँग्रेसच्या अंतर्गत रणनीतीची जबरदस्तीने चोरी करून ती ताब्यात घेण्याचा होता, असा आरोप ममता यांनी केला. ईडीने ज्या ठिकाणी छापेमारी केली तेथे स्वत: पोहोचून आपण कोणतेही गैरकृत्य केलेले नाही, असा दावाही ममता यांनी केला.

कोलकातामध्ये एका मोर्चाला संबोधताना ममता म्हणाल्या की, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यासह भाजपच्या कोणत्या नेत्यांना कोळसा घोटाळ्यातून लाभ झाला त्याचे पुरावे आपल्याकडे असून गरज भासल्यास आपण ते जाहीर करू. कोळसा घोटाळ्यातील पैशांचा संबंध स्पष्ट करताना त्यांनी तृणमूल काँग्रेसचे माजी नेते सुवेन्दू अधिकारी आणि अमित शहा यांची नावे घेतली आणि त्याबाबतच्या पुराव्याचा पेन ड्राइव्ह आपल्याकडे असल्याचा इशाराही ममतांनी दिला.

**पक्षप्रमुख म्हणून हस्तक्षेप केल्याचा दावा**

जवळपास १० कि.मी. अंतर मोर्चाचे नेतृत्व केल्यानंतर मोर्चाला संबोधताना त्या म्हणाल्या की, ईडीच्या छापेमारीमध्ये आपण हस्तक्षेप केला ते मुख्यमंत्री म्हणून नव्हे तर तृणमूल



काँग्रेसच्या पक्षप्रमुख म्हणून केला. पक्षाच्या अध्यक्षा या नात्याने आपण तसे केले, आपण काहीही बेकायदेशीर केलेले नाही. आय-पॅकचे प्रमुख प्रतीक जैन यांच्या निवासस्थानी छापेमारी सुरू असताना ममता तेथे घुसल्या आणि इलेक्ट्रॉनिक उपकरणांसह ममता यांनी काही महत्त्वाचा पुरावा असलेला दस्तांेज आपल्यासोबत नेला, असा आरोप ईडीने केला. ईडीने सकाळी ६ वाजता छापेमारी केली, तर आपण दुपारी तेथे पोहोचलो, असे ममता म्हणाल्या. मात्र तोपर्यंत त्यांनी सर्वकाही चोरले होते. ईडी तपास करावयास आले होते, असे प्रथम आपला समज होता, मात्र ते पक्षाचे दस्तांेज आणि रणनीतीशी संबंधित कागदपत्रे चोरत असल्याची जाणीव झाली आणि आपण तेथे धाव घेतली, असेही मुख्यमंत्री म्हणाल्या. आय-पॅक ही तृणमूल काँग्रेसची राजकीय सल्लागार कंपनी आहे.



**खासदारांची दिल्लीत निदर्शने**

दरम्यान, ईडीच्या गैरवापराच्या निषेधार्थ दिल्लीत केंद्रीय गृहमंत्रालयाच्या कार्यालयाबाहेर निदर्शने करणाऱ्या तृणमूल काँग्रेसच्या अनेक खासदारांना ताब्यात घेण्यात आले. दिल्ली पोलिसांनी निदर्शने करणाऱ्या खासदारांना उचलून घटनास्थळावरून बाहेर हुसकावून लावले. गृहमंत्रालयाबाहेर निदर्शने करण्यास परवानगी नसल्याने खासदारांना ताब्यात घेण्यात आले आणि दुपारनंतर त्यांची सुटका करण्यात आली, असे पोलिसांनी सांगितले. हातात फलक घेऊन आणि घोषणाबाजी करणाऱ्या खासदारांमध्ये डेरेक ओ ब्रायन, शताब्दी रॉय, महुआ मोईत्रा, बापी हलदर, साकेत गोखले, प्रतिमा मोंडल, कीर्ती आझाद आणि शर्मिला सरकार यांचा समावेश होता.

---

## पनवेल मनपा निवडणूक २०२६: प्रभाग १२ मध्ये भाजप महायुतीच्या उमेदवारांचा जोरदार प्रचार

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२६ च्या पार्श्वभूमीवर कामोठे प्रभाग क्रमांक १२ मध्ये भारतीय जनता पार्टीच्या अधिकृत उमेदवारांनी प्रचाराचा धडाका लावला आहे. प्रभाकर शाबा कांबळे (अ),विद्या प्रकाश तामखडे (ब), कुसुम रविंद्र म्हात्रे (क) आणि दिलीप बाळाराम पाटील (ड) हे उमेदवार मतदारांशी थेट संवाद साधत घरोघरी जाऊन प्रचार करत आहेत.

प्रभागात आतापर्यंत झालेल्या विविध विकासकामांची माहिती देत कार्यकर्ते आणि उमेदवार मतदारांशी संवाद साधत असून, नागरिकांकडून या प्रचाराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. प्रचारादरम्यान घोषणाबाजी, नागरिकांचा सहभाग आणि कार्यकर्त्यांचा उत्साह पाहायला मिळत असून संपूर्ण प्रभाग क्रमांक १२ भाजपमहायुतीमय वातावरणात दुमदुमून



गेला आहे.विशेष म्हणजे, प्रभाग १२ मधील उमेदवारांपैकी दिलीप पाटील हे शिक्षण महर्षी असून या तर प्रभाकर कांबळे विद्या तामखडे आणि कुसुमताई हे समाजसेवक आहेत . त्यामुळे भाजपने या निवडणुकीत नागरिकांच्या समस्या सोडवणारे आणि अनुभव असलेले उमेदवार मतदारांसमोर दिले असल्याची चर्चा नागरिकांमध्ये होत आहे. याच कारणामुळे सुज्ञ मतदारांकडून या उमेदवारांचे स्वागत होत असून, विकासाभिमुख नेतृत्वाला पाठिंबा देण्याची भावना प्रभागात दिसून येत आहे.

---

## पक्षविरोधी कारवाई; आरपीआयच्या नऊ जणांचे सहा वर्षांसाठी निलंबन, सात जणांना कारणे दाखवा नोटीस

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** पक्षाचा आदेश न मानणे, पक्षविरोधी कारवाया करणे, पक्षशिस्त मोडणे, संघटनात्मक कामकाजास बाधा निर्माण करणे, पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२६ च्या प्रक्रियेत पक्षाच्या अधिकृत उमेदवारांच्या विरोधात प्रचार करणे, पत्रकार परिषद घेऊन जिल्हा अध्यक्षांविषयी आक्षेपार्ह विधाने करणे तसेच पक्षाच्या अधिकृत भूमिकेच्या विरोधात भूमिका घेणे या



गंभीर कारणांमुळे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षाचे रायगड जिल्हा अध्यक्ष तसेच पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२६ साठी नियुक्त निरिक्षक व प्रभारी नरेंद्र गायकवाड यांनी नऊ पदाधिकारी व कार्यकर्त्यांचे पुढील सहा वर्षांसाठी निलंबन केले आहे.

पक्ष संघटना मजबूत ठेवणे, कार्यकर्त्यांमध्ये शिस्त व एकात्मता राखणे तसेच जनतेसमोर पक्षाची सकारात्मक प्रतिमा कायम ठेवणे या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आला आहे. निलंबनाच्या कालावधीत संबंधित व्यक्तींना कोणतेही पक्षीय पद अथवा जबाबदारी राहणार नाही. तसेच सात जणांना कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. मोहनिश गायकवाड (प्रभारी, पनवेल महानगर क्षेत्र), प्रभू जाधव (खारघर), विजय गायकवाड (तळोजा), प्रविण जाधव (पनवेल), शरद पाटील (जिल्हा उपाध्यक्ष), नविन सोनावणे (कळंबोली). राजू इंगळे (खांदा कॉलनी), संतोष सोनकांबळे (खारघर), सूरज कदम (कळंबोली) यांचे निलंबन करण्यात आले असून पक्षविरोधी भूमिका घेतल्याच्या कारणावरून हिरामण गायकवाड, विजय पवार (तालुका अध्यक्ष, पनवेल), सुनील सप्रे, जयप्रकाश पवार, जिवक गायकवाड, अशोक गोतारणे, नितीन मोरे यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात असून सदर नोटीस प्राप्त झाल्यापासून चार दिवसांच्या आत लेखी खुलासा न केल्यास पक्षातर्फे त्यांच्यावरही निलंबनाची कारवाई करण्यात येईल, असे नरेंद्र गायकवाड यांनी पत्रकार परिषदेत प्रसिद्धी माध्यमांत सांगितले.

---

## दैनिक युवक आधारच्या २०२६ सालच्या दिनदर्शिकेचे दिमाखदार प्रकाशन

**दैनिक युवक आधार**

**संजय कदम :** दैनिक युवक आधार या विश्वासार्ह आणि लोकाभिमुख वृत्तपत्राच्या वतीने प्रकाशित करण्यात आलेल्या २०२६ सालच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन आज माजी खासदार व लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते अत्यंत दिमाखदार वातावरणात पार पडले. पत्रकारिता, सामाजिक बांधिलकी आणि वाचकाभिमुख माहिती यांचा संगम असलेल्या या दिनदर्शिकेचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

दैनिक युवक आधारचे संस्थापक संपादक संतोष शिवदास आमले यांनी पत्रकारितेच्या माध्यमातून गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक तसेच जनहिताच्या विषयांना प्राधान्य देत वाचकांशी नाते जोडले आहे. याच परंपरेत २०२६ सालची दिनदर्शिका माहितीपूर्ण,



आकर्षक व उपयुक्त स्वरूपात साकारण्यात आली आहे.

या दिनदर्शिकेच्या प्रकाशनप्रसंगी रामशेठ ठाकूर यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की, “आजच्या धकाधकीच्या जीवनात घराघरात असणारी दिनदर्शिका ही केवळ तारखा पाहण्याचे साधन राहिलेले नसून ती ज्ञान, माहिती आणि संस्कार देणारे माध्यम ठरले आहे. दैनिक युवक आधारची ही दिनदर्शिका अत्यंत सुंदर रचना, अचूक माहिती आणि उपयुक्त संदर्भांनी परिपूर्ण असून घरातील लहानांपासून ज्येष्ठांपर्यंत प्रत्येकाला निश्चितच मार्गदर्शक ठरेल.”

या प्रकाशन सोहळ्यास ज्येष्ठ पत्रकार संजय कदम, रायगड ग्राम सिटीचे संपादक अण्णासाहेब आहेर, रायगड टाइम्सचे प्रतिनिधी राम बोरले, दैनिक युवक आधारचे संपादक संतोष शिवदास आमले, सहसंपादक मुकुंद कांबळे, मुंबई विभाग संपादक किशोर गुडेकर, पनवेल तालुका प्रतिनिधी मच्छिंद्र पाटील, पनवेल प्रतिनिधी जगदीश क्षीरसागर यांच्यासह पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते व विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी दैनिक युवक आधारच्या सामाजिक बांधिलकीचे व वस्तुनिष्ठ पत्रकारितेचे कौतुक करत भविष्यातही अशाच उपक्रमांच्या माध्यमातून समाजप्रबोधनाचे कार्य सुरू ठेवावे, अशा शुभेच्छा दिल्या.

दिनदर्शिकेच्या प्रकाशनानिमित्ताने संपादक संतोष शिवदास आमले यांनी सर्व मान्यवरांचे व वाचकांचे आभार मानत, दैनिक युवक आधार ही केवळ बातमी देणारी नाही तर समाजाचा आवाज बनणारी माध्यम संस्था असल्याचे नमूद केले.

---

## दैनिक युवक आधार २०२६ दिनदर्शिकेचे प्रकाशन उद्योगपती सुधीर कटेकर यांच्या हस्ते

**दैनिक युवक आधार**

**संतोष आमले संपादक :** दैनिक युवक आधार या अल्पावधीत महाराष्ट्रभर लोकप्रिय झालेल्या वृत्तपत्राच्या २०२६ सालच्या दिनदर्शिकेचे भव्य प्रकाशन उद्योगपती सुधीर कटेकर यांच्या शुभहस्ते करण्यात आले. विशेष बाब म्हणजे, हे प्रकाशन सुधीर कटेकर यांच्या वाढदिवसानिमित्त शांतीवन अनाथाश्रमात पार पडले.

दैनिक युवक आधारचे संपादक संतोष शिवदास आमले यांनी वाचकांसाठी हे लोकप्रिय दैनिक सुरू केले असून, गेल्या वर्षीप्रमाणे यंदाही २०२६ ची माहितीपूर्ण व उपयुक्त दिनदर्शिका तयार करण्यात आली आहे. ही दिनदर्शिका सर्वसामान्य वाचकांसाठी मार्गदर्शक ठरणार असून, तिच्या माध्यमातून



दैनिक युवक आधार घराघरात पोहोचेल, असा विश्वास उद्योगपती सुधीर कटेकर यांनी प्रकाशनावेळी व्यक्त केला.

यावेळी बोलताना सुधीर कटेकर म्हणाले की, “दैनिक युवक आधारने अल्पावधीत विश्वासार्हतेचे स्थान निर्माण केले आहे. दिनदर्शिकेच्या माध्यमातून समाजोपयोगी माहिती सर्वसामान्यांपर्यंत पोहोचणे ही अभिनंदनीय बाब आहे.”या कार्यक्रमास उद्योजक संतोष पांडे, महाराष्ट्र संपादक अजय कापरे, मुंबई विभाग संपादक दिलीप ढेकळे, सहसंपादक मुकुंद कांबळे, संपादक संतोष शिवदास आमले, अनुराग संतोष आमले यांच्यासह शांतीवन अनाथाश्रमातील मुख्याध्यापक, शिक्षकवर्ग व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.सामाजिक बांधिलकी जपत अनाथाश्रमात पार पडलेले हे प्रकाशन सर्व उपस्थितांसाठी प्रेरणादायी ठरले.

# आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांची जयंती साजरी

## फुलसावंगी पत्रकार संघाला हक्काचे कार्यालय

**दैनिक युवक आधार**

**एम.डी.सुरोशे महागाव (यवतमाळ) :** आद्य पत्रकार तथा दर्पणकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त फुलसावंगी येथे पत्रकार दिनाचे आयोजन करण्यात आले. यावेळी ग्रामपंचायतीच्या जुन्या कार्यालयाची इमारत फुलसावंगी पत्रकार संघासाठी देण्यात येऊन, त्या कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच सारजाबाई वाघमारे होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून नायब तहसीलदार गजानन पराते, पोलिस सहाय्यक उपनिरीक्षक अमोल राठोड, जेष्ठ पत्रकार गजानन वाघमारे, जेष्ठ पत्रकार संजय भगत, गणेश भोयर उपस्थित होते.

यावेळी उपसरपंच कुणाल नाईक, विजयराव महाजन, जानी नवाब, डॉ.चंदन पांडे, दिनेश नाईक, हिरामण आडे, योगेश वाजपेयी, बाबु खान पठाण, नरेंद्र शिंदे, आरिफ लाला, शेख मजहर, अमरदिप दळवे, रविंद्र पांडे, गोधाजी कांबळे, वसंता भिसे, अजय देशपांडे, तंटामुक्त अध्यक्ष कयाम नवाब, डॉ.अब्दुल कुंदन, इमरान पठाण, बबन शेळके, आझम लाला,शमिम कुंदन, मोहम्मद युनूस,




शेख फारुख, रमेश जाधव, रवी पटवे यांच्यासह फुलसावंगी व परिसरातील पत्रकार बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गजानन पराते,ना तहसीलदार यांनी बाळशास्त्री जांभेकर यांच्या पत्रकारितेतील योगदानाचा उल्लेख करून पत्रकारांनी समाजप्रबोधनाची भूमिका प्रामाणिकपणे निभावावी, असे मत व्यक्त केले. पत्रकार संघासाठी स्वतंत्र कार्यालय उपलब्ध झाल्याने पत्रकारांमध्ये समाधान व्यक्त करण्यात आले.यावेळी डॉ गजानन वैद्य, विवेक पांढरे,विवेक शेळके,अजय पाचंगे,शैलेश पेंटवाड,शे रिज्वान,विक्की भिसे,सचिन छनिकर,संजय जाधव,करम खान,चंद्रशेखर पंडागळे,ज्ञानेश्वर सोमेवाड कार्यक्रमाचे सुत्रसंचलन शेख तसलीम यांनी केले, तर आभार शैलेश वानखेडे यांनी मानले.

# "इमॅजिकाचा कल्ला अन् शिवरायांचा किल्ला पालोदकर महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची सहल ठरली 'सुपरहिट'!"

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर/सिल्लोड :** पुस्तकातील इतिहास जेव्हा प्रत्यक्ष नजरेसमोर उभा ठाकतो, तेव्हा तो काळजावर कायमचा कोरला जातो. पालोद येथील सहकार महर्षी माणिकराव पालोदकर महाविद्यालयाच्या १६४ विद्यार्थ्यांनी नुकताच असाच एक ऐतिहासिक आणि साहसी प्रवासाचा अनुभव घेतला. इयत्ता ९ वी ते १२ वीच्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित केलेली ही चार दिवसीय शैक्षणिक सहल मोठ्या उत्साहात आणि शिस्तबद्ध नियोजनात यशस्वीरीत्या पार पडली. सहलीला रवाना होताना संस्थेचे सचिव डॉ. राहुल पालोदकर, प्रतिष्ठित नागरिक व पालकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून विद्यार्थ्यांना निरोप दिला.

या सहलीचे नियोजन केवळ पर्यटन म्हणून नव्हे, तर 'प्रत्यक्ष अनुभव' या उद्देशाने करण्यात आले होते. लोणावळ्यातील इमॅजिका वॉटर पार्कमध्ये जलक्रीडेचा मनसोक्त आनंद लुटल्यानंतर विद्यार्थ्यांनी



अष्टविनायकांपैकी एक असलेल्या पालीच्या बल्लाळेश्वराचे दर्शन घेतले. अरबी समुद्राच्या लाटांवर स्वार होत ऐतिहासिक मुरुड जंजिरा किल्ला आणि श्रीवर्धनचा समुद्रकिनारा शिक्षकांच्या काटेकोर सुरक्षेखाली विद्यार्थ्यांनी अनुभवला. महाडच्या चवदार तळ्याचे ऐतिहासिक महत्त्व जाणून घेतल्यानंतर, स्वराज्याची राजधानी किल्ले रायगड आणि किल्ले प्रतापगड सर करताना विद्यार्थ्यांचा राष्ट्रभक्तीचा उत्साह ओसंडून वाहत होता. पाचाड येथील राजमाता जिजाऊंची समाधी, शिवकालीन खेडेगाव, महाबळेश्वरचे निसर्गसौंदर्य आणि जेजुरीचा खंडोबा अशा विविध स्थळांच्या भेटीने सहल समृद्ध झाली.

संपूर्ण प्रवासात उत्कृष्ट भोजन व्यवस्था आणि सुरक्षिततेची चोख अंमलबजावणी करण्यात आली होती. प्रवासात रंगलेल्या नाटिका, अभंग, भक्तीगीते आणि वनभोजनामुळे

> "या सहलीमुळे विद्यार्थ्यांना इतिहास, भूगोल आणि पर्यावरणाचे प्रत्यक्ष ज्ञान मिळाले. अभ्यासक्रमातील धडे विद्यार्थ्यांनी डोळ्यांनी अनुभवल्याने त्यांचे शिक्षण खऱ्या अर्थाने समृद्ध झाले असून, हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आदर्श ठरेल."
> — प्राचार्य ज्ञानेश्वर काकडे

विद्यार्थ्यांमध्ये एकीची भावना निर्माण झाली.

कठीण भौगोलिक ठिकाणांवरही शिक्षकांनी घेतलेली विशेष दक्षता पाहून पालकांनी महाविद्यालयाचे कौतुक केले आहे. या यशस्वी नियोजनासाठी शिक्षक प्रदीप कानडजे, राजेश ठोंबरे, सुनील तांबे, भास्कर केरले, सुनील सागरे, योगेश निंभोरे, एकनाथ जंजाळ, प्रफुल्ल कळम, गजानन सपकाळ, डॉ. गणेश दिवटे, डॉ. रमेश काळे, संजय जाधव, महादेवी ठवरे आणि अक्षय निकम यांनी परिश्रम घेतले.

# भाजपा व राष्ट्रवादी काँग्रेस सत्तेत राहुन एकमेकावर आरोप कसले करतात? हिम्मत असेल तर सत्तेतून बाहेर पडा: हर्षवर्धन सपकाळ

## सांस्कृतिक शहर, विद्यचे माहेरघर असलेल्या पुण्याची ओळख आता ड्रग्ज; गुंडगिरी व कोयता गँगचे माहेरघर झाली

**दैनिक युवक आधार**

**पुणे / प्रतिनिधी :** राज्यात भाजपा, शिंदेसेना व अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ट्रिपल इंजिन सरकार आहे. तिन्ही पक्ष फक्त सत्तेची मलई खाण्यासाठी एकत्र आहेत. सत्तेत राहून अजित पवार भाजपावर व भाजपा अजित पवारांवर जाहीर व गंभीर आरोप करत आहेत. या दोन्ही पक्षांना आरोपच करायचे असतील तर सत्तेला चिकटून कशाला बसता, सत्तेतून बाहेर पडा व मग आरोप करा, असे आव्हान महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी दिले आहे.

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष



हर्षवर्धन सपकाळ यांचा राज्यभर झंझावाती प्रचार सुरु आहे. विदर्भ, मराठवाड्यात प्रचार सभा घेऊन आज त्यांनी पुणे व ठाण्यात पदयात्रा व रॅलीमध्ये सहभाग घेतला तसेच प्रचार सभाही घेतल्या. पुण्यात पत्रकार परिषदेत बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले की, भारतीय जनता पक्ष हा सर्वात भ्रष्ट पक्ष आहे असा आरोप अजित पवार करत आहेत तर भाजपा अजित पवारांवर भ्रष्टाचाराचे आरोप करत आहेत. पार्थ पवार यांच्या जमीन घोटाळयावर विचारले असता अजित पवार जय जिनेंद्र व जय जैन बोर्डिंग म्हणतात. सरड्यालाही लाजवेल असे रंग हे लोक बदलत आहेत. सत्तेत राहुन एकमेकावर आरोप करण्यापेक्षा अजित पवारांनी राजीनामा देऊन सत्तेतून बाहेर पडावे अन्यथा भाजपाने अजित पवारांच्या पक्षाचा पाठिंबा नाकारावा. पण ते तसे करणार नाहीत. दोन्ही पक्ष एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. भाजपा शिंदेसेना व राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष यांच्यात नैतिकता राहिलेली नाही.

सपकाळ पुढे म्हणाले की, पुणे शहराला मोठी ऐतिहासिक, सांस्कृतिक, शैक्षणिक परंपरा व वारसा लाभलेला आहे. पुणे हे विद्येचे माहेरघर, सांस्कृतिक शहर अशी ओळख होती पण आता पुण्यात ड्रग्जचा काळा धंदा, कोयता गँग, भ्रष्ट व पायाभुत सुविधांचा बोजवारा उडालेले शहर अशी ओळख बनली आहे. आता पुणेकरांनीच आपला पुणेरी बाणा जपला पाहिजे, असे अवाहन सपकाळ यांनी केले आहे.

एका प्रश्नाला उत्तर देताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले की, भारतीय जनता पक्ष हा दुबळा पक्ष आहे, त्यांना पक्षात कोणीही चालते. गुंड, मवाली यांना तर त्यांनी पक्षात सामावून घेतलेच आहे आता त्यांनी बलात्काऱ्यांनाही पक्षात सामावून घेतले आहे, असे सपकाळ म्हणाले.

या पत्रकार परिषदेला प्रदेश काँग्रेसचे वरिष्ठ उपाध्यक्ष माजी आमदार मोहन जोशी, प्रदेश काँग्रेसचे खजिनदार अभय छाजेड, माजी आमदार दिप्ती चवधरी, वरिष्ठ प्रवक्ते गोपाळ तिवारी व पदाधिकारी उपस्थित होते.

# जि.प. अध्यक्ष चषक स्पर्धेत वांगण (सु.) शाळेचे घवघवीत यश

**दैनिक युवक आधार**

**राजेंद्र टोपले, सुरगाणा :** दिनांक - ९/ १/ २०२६ रोजी सुरगाणा तालुक्यातील पी.एम. श्री शाळा पळसन येथे जि.प. अध्यक्ष चषक बीटस्तरीय सांस्कृतिक व क्रीडास्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

या स्पर्धेत विविध शाळेतील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा यासाठी मा. उपशिक्षणाधिकारी तथा शिक्षण विस्तार अधिकारी श्री. कोळी साहेब, तसेच मा. केंद्र प्रमुख श्री. यशवंत चौधरी साहेब यांच्या उपस्थित स्पर्धा यशस्वीरीत्या पार पाडण्यात आल्या. यामध्ये वैयक्तिक नृत्य, गीतगायन, वत्कृत्व स्पर्धा, रनिंग, स्पेलिंग



बी, मॅथ बी, चित्रकला, खो खो, कबड्डी अशा क्रिडाप्रकारांचा समावेश होता.

स्पर्धा अत्यंत चुरशीच्या झाल्या असून प्रत्येक संघाने आपले कौशल्ये दाखवले. या स्पर्धेत वत्कृत्व स्पर्धा लहान व मोठा गट प्रथम क्रमांक, धावणे लहान गट व मोठा गट प्रथम क्रमांक, समुहगीतगायन प्रथम, समुहनृत्य प्रथम, खो-खो मुली प्रथम, वैयक्तिक गीतगायन द्वितीय, समुहगीत गायन दितीय, वैयक्तिक नृत्य द्वितीय, तृतीय,व खो-खो मुले द्वितीय या क्रीडाप्रकारात आपल्या शाळेने नाव उंचावत घवघवीत यश संपादन केले.

या विद्यार्थ्यांच्या यशात शाळेतील सर्व शिक्षकवृंद, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष- सदस्य, तसेच गावातील ज्येष्ठ तरुण गावकरी मंडळी, महिला भगिनींचे मोलाचे सहकार्य लाभले. परिसरातून सर्व विजयी विद्यार्थ्यांचे व सहभागी विद्यार्थ्यांचे अभिनंदन होत आहे. तरी विदयार्थ्यांच्या पुढील भावी आयुष्यासाठी व वाटचालीसाठी शुभेच्छा!

# खडकी (डोंगरगाव) येथे बिबट्याचा थरार; चार वर्षांच्या चिमुकल्यावर प्राणघातक हल्ला

**दैनिक युवक आधार**

**सचिन बन्सोड प्रतिनिधी जिल्हा (गोंदिया) :** तिरोडा तालुक्यातील खडकी (डोंगरगाव) येथे आज सकाळी साडेसात वाजताच्या सुमारास घडलेल्या एका हृदयद्रावक घटनेने संपूर्ण परिसर हादरून गेला आहे. बिबट्याने चार वर्षांच्या चिमुकल्यावर हल्ला करून त्याला घरातून उचलून नेले, या हल्ल्यात त्या चिमुकल्याचा दुर्दैवी मृत्यू झाला.

या घटनेत मृत्युमुखी पडलेल्या चिमुकल्याचे नाव हियांश शिवशंकर रहांगडाले (वय ४) असे आहे.मिळालेल्या माहितीनुसार, हियांश हा आपल्या आई-वडिलांसोबत घराच्या मागील अंगणात चुलीजवळ बसलेला होता. त्याच वेळी दबा धरून बसलेल्या बिबट्याने अचानक हल्ला चढवत चिमुकल्याला उचलून नेले. पालकांनी आरडाओरड करत बिबट्याचा पाठलाग करण्याचा प्रयत्न केला. काही वेळाने चिमुकल्याचा मृतदेह आढळून आला.

या घटनेनंतर गावात प्रचंड संतापाची लाट उसळली असून भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

विशेष म्हणजे, बातमी लिहितपर्यंत वन विभाग व पोलीस प्रशासन अद्याप घटनास्थळी दाखल झालेले नव्हते.खडकी व परिसरात बिबट्याचा मुक्त संचार वाढला असून याआधीही अनेकदा ग्रामस्थांनी वन विभागाकडे तक्रारी केल्या होत्या. मात्र, वेळेवर ठोस उपाययोजना न झाल्याने आज एका निष्पाप जीवाला प्राण गमवावा लागल्याचा आरोप ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

या दुर्दैवी घटनेमुळे रहांगडाले कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून संपूर्ण गाव शोकसागरात बुडाले आहे. प्रशासनाने तातडीने बिबट्याचा बंदोबस्त करावा, पीडित कुटुंबाला तात्काळ मदत व नुकसानभरपाई द्यावी, अशी जोरदार मागणी ग्रामस्थांकडून होत आहे

# किन्ही येथे यात्रेनिमित्त मोफत नेत्रतपासणी शिबीर संपन्न

**दैनिक युवक आधार**

**सोयगाव तालुका प्रतिनिधी/ विजय काळे :** तालुक्यातील किन्ही येथे यात्रेच्या निमित्त भव्य नेत्रतपासणी शिबीर घेण्यात आले,स्वप्नपुर्ती फाउंडेशन व लायन्स हॉस्पीटल संभाजीनगर यांच्या संयुक्त विद्यमाने तालुक्यात विविध ठिकाणी शिबीराचे आयोजन करण्यात येते यावर्षी किन्ही तालुका सोयगाव येथे या शिबीराची सुरूवात करण्यात आली ,छ.शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पुजन करून कार्यक्रमाला सुरूवात केली यावेळी कार्यक्रमाचे उध्दघाटन गावचे युवानेते सागर झाल्टे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले.शिबीरात लायन्स हॉस्पीटल संभाजीनगर येथिल



वरीष्ठ डॉक्टर याचा सहभाग होता, या कार्यक्रमाचे नियोजन स्वप्नपर्ती फाउंडेशन चे संस्थापक अध्यक्ष समाधान शिंदे व कार्याध्यक्ष सुरज सपकाळ यांच्या वतीने करण्यात आले,यावेळी शिबीरात ३१९ रूग्णाची तपासणी होऊन ४१ रूग्णाची लायन्स हॉस्पीटल येथे मोतिंबिदू शस्त्रक्रिया साठी पाठवण्यात येणार आहे. सदरील कार्यक्रमाच्यायशस्वीतेसाठी राहूल जाधव,रवीद्र सपकाळ,चंद्रकात सपकाळ,सचिन पवार,किशोर वाडेकर याचा विषेश सहभाग होता.

## जाफराबाद तालुका नवनियुक्त पदभार स्वीकारल्याने गटविकास अधिकारी मगर यांचे स्वागत करताना प्रहार संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते



**दैनिक युवक आधार**

**जाफराबाद सर्कल प्रतिनिधी/दिनकर जंजाळ :** जाफराबाद तालुक्यातील नवनिर्वाचित गटविकास अधिकारी देविदास मगर यांचे स्वागत करताना प्रहार प्रहार संघटना जाफराबाद तालुक्यातील पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.सुनील पंडित प्रहार प्रहार जनशक्ती पक्ष तालुका अध्यक्ष जाफराबाद.सिध्देश्वर वारागणे सचिव जालना.शरद पंडित सघटक जालना.अरुण जंजाळ उपाध्यक्ष जाफराबाद.मनोहर जंजाळ जगणं गवळी.दगडूबा शिंदे.तान्हाजी पंडित.अमोल पवार.किशोर भिसे.पंढरी म्हस्के.संदीप शिंदे. एकानाथ पाचारने.अमोल .शिंदे ज्ञानेश्वर बनकर. अदी उपस्थित होते.

# निम्न पैनगंगा प्रकल्पाच्या कामात स्थानिक मजुरांना प्राधान्य द्या

**दैनिक युवक आधार**

**घाटंजी तालुका प्रतिनिधी/महेश पेन्दोर :** यवतमाळ जिल्ह्यात सध्या अतिवृष्टीमुळे शेतकरी आणि कष्टकरी वर्ग मोठ्या संकटात सापडला आहे.

पिकांचे नुकसान झाल्यामुळे ग्रामीण भागात रोजगाराचा प्रश्न गंभीर झाला असून, अशा परिस्थितीत निम्न पैनगंगा धरणाच्या कामात स्थानिक लोकांनाच मजुरी मिळावी, अशी मागणी जोर धरत आहे.

**शेतकरी आर्थिक अडचणीत**

यावर्षी झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतीचे अतोनात नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांच्या हातातून पीक गेल्यामुळे कुटुंबाचा उदरनिर्वाह कसा करावा, हा मोठा प्रश्न आहे. जिल्ह्यात मोठ्या एमआयडीसी किंवा कारखाने नसल्यामुळे तरुणांना रोजगारासाठी इतर शहरांकडे धाव घ्यावी लागत आहे.

**बाहेरच्या मजुरांऐवजी स्थानिकांना संधी द्या**

निम्न पैनगंगा प्रकल्पाचे काम सध्या जोरात सुरू आहे. मात्र, या ठिकाणी अनेकदा बाहेरच्या जिल्ह्यातील किंवा राज्यांतील मजूर लावले जातात. आमची विनंती आहे की, कंत्राटदारांनी आजूबाजूच्या खेडेगावातील गरीब मजूर आणि बेरोजगार तरुणांना या कामात सामावून घ्यावे.

**प्रशासनाने दखल घेण्याची गरज**

महाराष्ट्र शासन आणि संबंधित कंत्राटदारांनी याकडे लक्ष देऊन स्थानिक लोकांना कामावर घेण्याचा निर्णय घ्यावा. जर स्थानिकांना या प्रकल्पात रोजगार मिळाला, तर अतिवृष्टीमुळे ओढवलेल्या आर्थिक संकटातून सावरण्यास त्यांना मोठी मदत होईल.

**मुख्य मागण्या:**

१. धरणाच्या कामात आजूबाजूच्या गावातील मजुरांना पहिली पसंती द्यावी.

२. स्थानिक सुशिक्षित तरुणांना त्यांच्या कौशल्यानुसार काम द्यावे.

३. कंत्राटदारांनी स्थानिक मजुरांच्या नोंदणीसाठी विशेष मोहीम राबवावी.

# पीक विम्यासाठी शेतकरी संघटनेचे वाशिम रिसोड महामार्गावर रास्ता रोको आंदोलन

**दैनिक युवक आधार**

**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम/गजानन पवार पाटील :** हक्काच्या पिक विम्यासाठी क्रांतिकारी शेतकरी संघटना आक्रमक होत रस्त्यावर उतरली आहे,एकीकडे सरकार शेतकऱ्यांना फसवून सांगत आहे की,आम्ही शेतकऱ्यांना पिक विमा देणार आहोत.परंतु एक दमडी सुद्धा शेतकऱ्यांच्या खात्यावर मिळाली नसल्याने क्रांतिकारी शेतकरी संघटना आता रस्त्यावरची लढाई लढत आहे गजानन कावरखे क्रांतिकारी शेतकरी संघटना मराठवाडा अध्यक्ष,यांच्या नेतृत्वात रास्ता रोको केला यावेळी सतीश इढोळे,नामदेव



पतंगे, बालाजी मोरे,प्रवीण मते,गजानन पैठणकर,संदीप खोलगडे, विशाल पोळ,राहुल कावरखे,मनोहर सावके ,गजानन घाटूळकर,पांडुरंग देशमुख,हे क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे पदाधिकारी हजर होते,कृषी विभाग वाशिम यांना चांगलेच धारेवर धरले काही अंशी पीक विम्याचा मार्ग मोकळा झाला असून येत्या काही दिवसांमध्ये हा प्रश्न पूर्णपणे मार्गी लागला नाही तर मुंबई मंत्रालय येथे जाऊन आंदोलन करू असा इशारा क्रांतिकारी शेतकरी संघटनेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी दिला आहे.

# कोळी समाजाच्या कन्येचा 'जागतिक वेध' आंतरराष्ट्रीय नेमबाज अवनी कोळीने दिल्लीत उडवला पदकांचा चौकार

**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर उरण प्रतिनिधी :** मुलीच्या हातात पाण्याचा हंडा देऊन तिला संसाराच्या चौकटीत अडकवण्यापेक्षा तिच्या हातात "देश जिंकण्यासाठी बंदूक दिली तर ती इतिहास घडू शकते" हे उरण तालुक्यातील दिघोडे गावच्या एका सामान्य कोळी कुटुंबातील आई-वडिलांनी सिद्ध करून दाखवले आहे, आंतरराष्ट्रीय नेमबाज अवनी अलंकार कोळी हिने दिल्लीच्या डॉ.कर्णिसींग शूटिंग रेंज वर पार पडलेल्या ६८ सा व्या राष्ट्रीय शूटिंग अजिंक्यपद स्पर्धेत शॉर्ट गन डबल ट्रॅप ज्युनिअर वुमन टिम व युथ वूमन टीम मध्ये २ सुवर्णपदके महाराष्ट्र संघ व वैयक्तिक ज्युनिअर आणि युथ मध्ये २ कांस्य पदके पटकावून उरणच्या मातीचा सुगंध देशभर दरवळला आहे.

खेडेगावातील जिद्द आणि विख्यात नेमबाज पदवी उरण मधील दिघोडे सारख्या छोट्याशा गावातून आलेल्या अवनीने अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत हा प्रवास सुरू केला आहे. नेमबाजी हा खेळ अत्यंत खर्चिक मानला जातो. मात्र अवनीची आई सौ कविता अलंकार कोळी आणि वडिलांनी स्वतःच्या गरजा बाजूला ठेवून आपल्या लेकीच्या स्वप्नांना बळ दिले .कोळी समाजातील एका सामान्य घरातील मुलीने बंदुकीचा नेम धरून विख्यात नेमबाजी पदवी संपादन करणे ही संपूर्ण समाजासाठी ,गावासाठी, जिल्ह्यासाठी आणि देशासाठी अभिमानाची गोष्ट ठरत आहे.



अवनीने ज्युनियर वुमन टीम मध्ये २ सुवर्ण आणि वैयक्तिक २ कांस्यपदके पटकावले, सोबतच कार्तिकी मानस देवळेकर आणि वरा मानस देवळेकर या बहिणींनी महाराष्ट्र संघाचे प्रतिनिधित्व करत विख्यात नेमबाज पदवी मिळवली. तसेच ट्रॅपगन मध्ये मुसा काझी विख्यात नेमबाज झाला. हे सर्व सिध्दांत रायफल क्लबचे मेंबर्स आहेत.त्यांचे प्रशिक्षक रालस्टोन कोइलो बी आय एस एस एफ सर्टिफाइड कोच यांच्याकडे त्यांच्याकडे अवनी कोळी मुसा काजी प्रशिक्षण घेतात कार्तिकी आणि वरा या बहिणी मोहनिश हिरवे यांच्याकडे नेमबाजीचे प्रशिक्षण बालेवाडी येथे शूटिंग रेंज वर घेतात. तसेच पिस्तूल शूटिंग स्पर्धेत किशन खारके यांनी २५ मी.सेंटर फायर पिस्तुल मध्ये रायगड व नवी मुंबईतून पहिले विख्यात नेमबाज होण्याचा मान मिळवला. जयंता साळवे मुंबई हा सेंटर फायर पिस्तूल मध्ये सुद्धा व्याख्यान नेमबाज झाला. सुप्रीता रामनाथ सुबुदी उलवे नवीमुंबई यांनीही दुसऱ्यांदा विख्यात नेमबाजी होण्याची कामगिरी करून भारतीय संघाच्या निवड चाचणीसाठी पात्रता मिळवली.

भोपाळ मध्ये प्रदेश येथे ११ डिसेंबर २०२५ते २ जानेवारी २०२६दरम्यान ६८ वी राष्ट्रीय शूटिंग अजिंक्य स्पर्धा रायफल संपन्न झाली या स्पर्धेत ५० मीटर प्रोन रायफल मध्ये गौरव जगदीश ठाकुर चिरनेर उरण, कुणाल मल्लिकेश पाटील जासई उरण, अथर्व काळे रत्नागिरी, नंदकुमार माने नवी मुंबई पोलीस, डॉ.आनंद कृष्णमूर्ती,सिमारजित सिंह राजकुमार हे सर्व विख्यात नेमबाज झाले. हे सर्वजण आयएसएसएफ कोच अलंकार कोळी यांच्याकडे रायफल प्रशिक्षण घेत आहेत.

त्यांच्या या यशाबद्दल क्लबचे अध्यक्ष विजय खारकर, सचिव प्रशिक्षक किशन खारके, प्रीतम पाटील, महेश फुलोरे नगरसेवक अंबरनाथ ,समाधान घोपरकर, सरपंच दापोली ,अजिंक्य चौधरी काटई ,किरण माळी अविनाश भगत, सुरेश थळे,सागर भोईर, किरण मोहिते ,निलेश भगत, प्रकाश दिसले, हेमंत भगत, संदेश पाटील ,जगदीश पाटील, शैलेश पाटील, जयदास पाटील, अर्जुन पाटील ,संतोष फडके, जितेश पाटील, राजू मुंबईकर समीर आंबवणे सर ,नंदकुमार मुंबईकर तसेच क्लबचे सदस्य मित्रपरिवार व ग्रामस्थ नेरे यांनी पुढील राज्ये नेमबाज स्पर्धेत करतात अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत

अवनीच्या यशाची बातमी वाचताना डोळ्यात पाणी आल्याशिवाय राहत नाही या समाजात आजही मुलींच्या शिक्षणासाठी संघर्ष करावा लागतो जिथे एका वडिलांनी आपल्या लेकीच्या खांद्यावर बंदुकीचे ओझे पकडण्यासाठी ताकद दिली आणि आईने घराच्या उंबरठ्याबाहेर पडण्याचे धाडस दिले माझ्या "आई-वडिलांनी माझ्या हातात हंडा दिला असता तर मी फक्त पाणी भरलं असतं पण त्यांनी बंदूक दिली म्हणूनच मी या देशासाठी पदक आणू शकले" या अवनीच्या भावना आज प्रत्येक मुलीला नवी दिशा देणारे आहेत दिघोडेगावच्या या आंतरराष्ट्रीय सुवर्ण कन्येचा हा प्रवास आता ऑलम्पिक च्या दिशेने झेपावला आहे.

## उंडणगावच्या लेकी झाल्या 'रणरागिणी'; लाठी-काठीच्या कडाक्याने घुमला स्वरक्षणाचा हुंकार!

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर/ सिल्लोड :** क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी ज्या हातांना लेखणी दिली, त्याच हातांना आता काळाची गरज ओळखून स्वरक्षणाची 'लाठी' बहाल करण्यात आली आहे. उंडणगाव येथील सावित्रीबाई कन्या विद्यालयात जयंतीचे औचित्य साधून सावित्रीच्या लेकींनी रणरागिणींचे रूप धारण करत लाठी-काठीचे धडे गिरवले. सौ. रीना संदीप इंगळे यांच्या पुढाकारातून राबवलेल्या या धाडसी उपक्रमाचे उंडणगावसह परिसरात मोठे कौतुक होत आहे.



केवळ भाषणांमधून स्त्री-शक्तीचा जागर न करता, मुलींना प्रत्यक्षात सुरक्षिततेची जाणीव करून देण्यासाठी या मोफत प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. प्रशिक्षक अनिकेत सोनवणे यांनी मुलींना लाठी-काठीचे तंत्र शिकवतानाच, संकटसमयी प्रसंगावधान राखून शत्रूवर वार कसा करावा, याचे थेट धडे दिले. हातातील काठीच्या प्रत्येक प्रहारासोबत या मुलींच्या डोळ्यांत जो आत्मविश्वास दिसत होता, तो महिला सक्षमीकरणाची नवी पहाट अधोरेखित करणारा ठरला.

राजकारणाच्या पलिकडे जात निव्वळ समाजहिताचा विचार मांडणाऱ्या सौ. रीना इंगळे यांनी महिलांच्या मनातील भीती दूर करण्यासाठी उचललेले हे पाऊल भविष्यात मैलाचा दगड ठरेल, असे मत ग्रामस्थांनी व्यक्त केले. या शिबिराला परिसरातील विद्यार्थिनी आणि महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. विद्यालयाचे मुख्याध्यापक अनिल लांडगे, प्राथमिक मुख्याध्यापक भाऊसाहेब वाघमोडे व संपूर्ण शिक्षक वृंदाने या प्रशिक्षणासाठी विशेष परिश्रम घेतले. आता उंडणगावची लेक पदर खोचून स्वतःच्या रक्षणासाठी सज्ज झाली आहे, हेच या शिबिराचे सर्वात मोठे यश ठरले.

## तळोजाचा विकास आणि वैभव अधिक उंचावण्यासाठी महायुती कटिबद्ध

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** पनवेल महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीचा प्रचार अंतिम टप्प्यात पोहोचला असून भारतीय जनता पक्ष, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस आणि आरपीआय यांच्या महायुतीने आपली संपूर्ण ताकद निवडणूक मैदानात उतरवली आहे. प्रभाग क्रमांक ३ मधील महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी तळोजा ओवे येथे भव्य शक्तीप्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले ते.



या वेळी माजी खासदार तथा लोकनेते रामशेठ ठाकूर आणि भाजपचे ज्येष्ठ नेते जे. एम. म्हात्रे यांनी महायुतीच्या विजयाचा ठाम विश्वास व्यक्त केला. भाजपच्या माध्यमातून परिसरात झालेल्या विविध विकासकामांमुळे मतदारांचा उत्स्फूर्त पाठिंबा मिळत असून प्रभाग क्रमांक ३ मध्ये महायुतीला मोठ्या मताधिक्याने विजय मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तळोजा शहराचा विकास आणि वैभव अधिक उंचावण्यासाठी महायुती कटिबद्ध असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

या प्रचाराच्या निमित्ताने प्रभाग क्रमांक ३ मधील उमेदवार निर्दोष केणी, विनोद घरत, मंजुळा कातकरी आणि प्रिती फुलाजी ठाकूर यांच्या समर्थनार्थ काढण्यात आलेल्या रॅलीला नागरिकांचा मोठा प्रतिसाद लाभला. ठिकठिकाणी उमेदवारांचे उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले असून परिसरात महायुतीच्या बाजूने जनमताचा कौल असल्याचे चित्र स्पष्टपणे दिसून येत आहे.यावेळी माजी नगरसेवक पापा पटेल, जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, जितेंद्र म्हात्रे, ॲड. इर्शाद शेख, सचिन वास्कर, वासुदेव घरत, जयदास तेलवणे यांच्यासह महायुतीचे सर्व उमेदवार, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सिल्लोडच्या नॅशनल शाळेत 'उद्योजकतेचे' धडे; चिमुकल्यांनी केली ३५ हजारांची उलाढाल!

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर/सिल्लोड :** केवळ पदव्या मिळवणे म्हणजे शिक्षण नसून, जीवनातील आर्थिक आणि व्यावहारिक गणिते समजणे महत्त्वाचे आहे. हाच उद्देश डोळ्यासमोर ठेवून गणेश कॉलनी येथील नॅशनल मराठी प्राथमिक शाळेत आयोजित 'आनंदनगरी' उपक्रमात विद्यार्थ्यांनी चक्क ३५ हजार रुपयांची विक्रमी उलाढाल केली. या उपक्रमातून चिमुकल्यांनी केवळ खाद्यपदार्थांची विक्रीच केली नाही, तर बदलत्या काळातील 'कॅशलेस' व्यवहारांचे तंत्रही आत्मसात केले.




या उपक्रमाचे उद्घाटन नगरसेवक विठ्ठल सपकाळ यांच्या हस्ते पार पडले. प्रमुख अतिथी म्हणून शहर पोलीस निरीक्षक शेषराव उदार उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते म्हणाले, "आज स्वतः कष्ट करून पैसे कमावताना तुम्हाला जे श्रम पडले, त्यावरून पालकांच्या कष्टाची जाणीव ठेवा. पालकांनी दिलेल्या पैशांचा विनियोग योग्य कामासाठीच करा . नोकरीच्या मागे न धावता विद्यार्थ्यांनी स्वयंरोजगाराचे गुण शालेय जीवनापासूनच अंगी बाणवावेत."

आनंदनगरीत विद्यार्थ्यांनी पाणीपुरी, भेळ, चाट, समोसे, वडापाव, गाजर हलवा, साबुदाणा वडा अशा ३२ विविध खाद्यपदार्थांची दुकाने लावली होती. विशेष म्हणजे, रोख व्यवहारासोबतच 'ऑनलाइन पेमेंट'ची सुविधाही उपलब्ध करून दिल्याने विद्यार्थ्यांना आर्थिक साक्षरतेचे धडे मिळाले.

यावेळी नॅशनल एज्युकेशन सोसायटीचे प्रशासकीय अधिकारी रईस खान, केंद्रप्रमुख किशोर जगताप, माजी नगराध्यक्ष राजश्री निकम, ज्येष्ठ नगरसेवक रईस पठाण, सुनील दुधे, बबलू पठाण, अशोक बनसोड, सुधाकर गायकवाड, सुधाकर पाटील, अकिल वसईकर, फहिम पठाण, शकुंतला बन्सोड, विशाल पाटील, कुणाल सहारे, शिवाजी दाभाडे, डॉ. संकेत ओस्तवाल, डॉ. अजीम, मुख्याध्यापक अब्दुल वहिद यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

मुख्याध्यापक गजानन निकम यांच्या मार्गदर्शनाखाली सोहेल कादरी, अंकुश मिरगे, शेख परवेज, दत्तू पंडित, कृष्णा दौड, ज्योती तायडे, आशा महाकाळ, छाया भागवत, जया कांबळे यांनी हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

## पोलीस आयुक्त कार्यालयाकडून ज्योत्स्ना एस.करवाडे यांचा पत्रकार सन्मान

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे/वाशीम जिल्हा प्रतिनिधी :** पत्रकारितेच्या माध्यमातून समाजहितासाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत दैनिक युवक आधार / डिजिटल मीडियाच्या प्रतिनिधी श्रीमती ज्योत्स्ना एस.खरवाडे यांना महाराष्ट्र पोलीस, पोलीस आयुक्त परिमंडळ क्रमांक ४, नागपूर शहर यांच्या वतीने पत्रकार सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.



समाजातील विविध प्रश्न, नागरिकांच्या समस्या, कायदा व सुव्यवस्थेशी संबंधित बाबी तसेच सामाजिक बांधिलकी जपत सातत्याने केलेल्या निर्भीड व वस्तुनिष्ठ पत्रकारितेबद्दल हा सन्मान प्रदान करण्यात आला आहे. सत्य, पारदर्शकता व लोकहित जपणारी पत्रकारिता करत प्रशासन व समाज यांच्यात समन्वय साधण्याचे कार्य त्यांनी प्रभावीपणे केल्याचे सन्मानपत्रात नमूद करण्यात आले आहे.

सदर सन्मानपत्रावर पोलीस उपायुक्त श्री. रश्मिकांत राव (IPS), पोलीस उपायुक्त, परिमंडळ क्रमांक ४, नागपूर शहर यांची स्वाक्षरी असून दिनांक ६ जानेवारी २०२५ रोजी नागपूर येथे हा सन्मान प्रदान करण्यात आला.

या सन्मानामुळे पत्रकारिता क्षेत्रातील जबाबदार व प्रामाणिक कार्याला बळ मिळाले असून, भविष्यातही समाजोपयोगी पत्रकारिता अधिक प्रभावीपणे सुरू ठेवण्याचा संकल्प ज्योत्स्ना एस.करवाडे यांनी व्यक्त केला आहे.

## कलानगरी वेलफेयर सोसायटी अमरावती आयोजित गुणगौरव सोहळा थाटात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी सौरव डांगरकर**

**अमरावती :** कलानगरी वेलफेयर सोसायटी अमरावती या सामाजिक संस्थेच्या 5 वर्धापन दिनानिमित्त गुण गौरव सोहळ्याचे व गाव वाला या मोबाईल अप्लीकेशनचे विमोचन जोशी हॉल अमरावतीला दिनांक 8 जानेवारी ला करण्यात आले असून या सोहळयामध्ये सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, कला, क्रीडा, तसेच सर्व क्षेत्रातील उल्लेख कार्य करणाऱ्या व्यक्तीचा मान्यवराच्या हस्ते पुरस्कार व फुलांचे रोपटे देऊन सन्मान करण्यात आले.




या कार्यक्रमाला कार्यक्रमाच्या उद्घाटिका सौ. अनुष्का वि. बेलोरकर समाजसेविका/प्रमुख प्रवक्त्या पसायदान अल्पसंख्यांक समूह कार्यक्रमाच्या अध्यक्षिका सौ. प्रीती साहू (वुमेन्स २४ न्युज चॅनेल च्या संपादिका विशेष अतिथी यश अनिल वाकळे बाल कलाकार (झी मराठी ड्रामा ज्युनियर्स फेम) विजयकुमार खंडारे सिने कलावंत (लाखनवाडीचा राजा फेम) प्रमुख पाहुणे सौ. ज्योत्स्ना करवाडे समाजसेविका व संपादिका (दैनिक युवक आधार विदर्भ)

श्रीमती निलिमा अशोक भोजने( जेष्ठ साहित्यिक ) सुधीर पेंडसे ( जेष्ठ कलावंत ) या सर्व मान्यवराची उपस्थिती कार्यक्रम ला लाभली या गुणगौरव सोहळ्यामध्ये करून कदम समाजसेविका व श्रीमती इंदुमती एकनाथ गोंडाणे माजी शिक्षिकायांचे विशेष सत्कार घेण्यात आले.

या कार्यक्रमाचे आयोजन कलानगरी वेलफेअर सोसायटीचे अध्यक्ष, सागर भोगे आशिष सुंदरकर उपाध्यक्ष, अमोल कोयकार कोषाध्यक्ष, विशाल वानखडे, अनिल मेश्राम सुजल दामोदर, नितेश कथे, प्रीती वानखडे, आदित्य खडसे, गणेश भोगे, मोहन स्वर्गे, साक्षी भोगे, राणी वानखडे, , पियुष वानखडे, प्रथमेश स्वर्गे, सचिन साबळे, यांनी आयोजन केले तसेच उत्कृष्ट सूत्रसंचालन संतोष हांडे, यांनी केले व आभार प्रदर्शन सागर भोगे, यांनी केले असून या कार्यक्रमाला प्रेक्षकांनाचा उस्फुर्त प्रतिसाद लाभला.

## पनवेल महापालिका निवडणुकीत केंद्रीय राज्यमंत्री सुरेश गोपींची उपस्थिती; महायुतीच्या प्रचाराला मोठा उत्साह

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू राज्यमंत्री व प्रसिद्ध अभिनेते सुरेश गोपी यांच्या उपस्थितीत खारघर, कळंबोली, कामोठे आणि नवीन पनवेल परिसरात प्रभाग क्रमांक ४ ते १६ मधील भाजप महायुतीच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ बैठका पार पडल्या. मंत्री गोपी यांच्या उपस्थितीमुळे या भागात मोठ्या प्रमाणात उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.या बैठकींना माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, ज्येष्ठ नेते जे. एम. म्हात्रे, जितेंद्र म्हात्रे, रमेश नायर यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



नवीन पनवेल, कामोठे, कळंबोली आणि खारघर परिसरात मोठ्या प्रमाणावर दक्षिण भारतीय नागरिक वास्तव्यास असल्याने मंत्री सुरेश गोपी यांनी त्यांच्या मातृभाषेत संवाद साधत त्यांच्याशी आपलेपणाने चर्चा केली. केंद्र सरकारने विकासाची गंगा घराघरात पोहोचवली असून, आमदार प्रशांत ठाकूर यांच्या माध्यमातून पनवेलमध्ये सुरू असलेल्या विकासकामांची गती कायम राखण्यासाठी महायुतीची सत्ता आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.आपल्या भाषणात मंत्री गोपी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारच्या विविध योजनांचा आढावा घेतला. उज्ज्वला योजना तसेच नैसर्गिक वायू क्षेत्रातील प्रगतीमुळे सर्वसामान्य महिलांचे जीवन अधिक सुसह्य झाले असल्याचे त्यांनी नमूद केले. पनवेलचा विकास हा 'विकसित भारत' या संकल्पनेचा तो महत्त्वाचा भाग असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

या बैठकींना भाजपच्या माजी जिल्हा सचिव संध्या शरबिद्रे, यमुना प्रकाशन, खारघर महिला मोर्चा अध्यक्ष साधना पवार, तसेच विविध महिला पदाधिकारी, दक्षिण सेल, तामिळ सेलचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते आणि मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.यावेळी महायुतीचे प्रभाग क्रमांक ४ ते १६ मधील सर्व उमेदवारही व्यासपीठावर उपस्थित होते. मंत्री सुरेश गोपी यांच्या उपस्थितीमुळे कार्यकर्त्यांमध्ये आणि मतदारांमध्ये नवचैतन्य निर्माण झाल्याचे चित्र दिसून आले.

## नायलॉन मांजामुळे जीविताला धोका; दबंग ठाणेदार भरत लसंते यांचा विक्रेत्यांना थेट इशारा

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे/वाशिम जिल्हा प्रतिनिधी :** (कारंजा लाड)धनज बु. परिसरात नायलॉन मांजामुळे नागरिकांच्या जीविताला गंभीर धोका निर्माण झाला असून अपघातांच्या घटनांमध्ये लक्षणीय वाढ होत आहे. दुचाकीस्वार, पादचारी, लहान मुले तसेच निरपराध पक्षी नायलॉन मांजाचे बळी ठरत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.\या पार्श्वभूमीवर धनज बुद्रुक पोलीस स्टेशनचे दबंग ठाणेदार भरत लसंते यांनी नायलॉन मांजाची विक्री, साठवणूक व वापर करणाऱ्या विक्रेत्यांना थेट व स्पष्ट इशारा दिला आहे. नायलॉन मांजा हा कायद्याने पूर्णतः प्रतिबंधित असून, त्याचा वापर अथवा विक्री



करणाऱ्यांवर कोणतीही दयामाया न दाखवता थेट गुन्हे दाखल करण्यात येणार असल्याचे त्यांनी ठामपणे सांगितले.ठाणेदार भरत लसंते यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथकाने धनज बुद्रुक परिसरात विशेष तपास मोहीम सुरू केली असून, अवैध नायलॉन मांजा विक्री करणाऱ्यांवर बारकाईने लक्ष ठेवण्यात येत आहे.“नागरिकांचे प्राण धोक्यात घालणाऱ्यांना कोणत्याही परिस्थितीत माफ केले जाणार नाही. नायलॉन मांजामुळे जर कुणाचे जीवित धोक्यात आले, तर त्यास संबंधित विक्रेतेच जबाबदार धरले जातील,” असा कडक इशाराही त्यांनी दिला.


पोलीस प्रशासनाच्या या आक्रमक भूमिकेमुळे नायलॉन मांजा विक्रेत्यांमध्ये खळबळ उडाली असून, कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी धनज बुद्रुक पोलीस प्रशासन सज्ज झाले आहे. नागरिकांनी नायलॉन मांजाचा वापर टाळावा तसेच कुठेही अवैध विक्री आढळून आल्यास तात्काळ पोलीस प्रशासनाला माहिती द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.या कठोर कारवाईमुळे धनज बुद्रुक परिसर नायलॉन मांजा मुक्त होईल, अशी अपेक्षा नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

# धावपळीच्या धकाधकीच्या जीवनात मानसिक आजार वाढले

**दैनिक युवक आधार**

**मुंबई / रमेश औताडे :** महाराष्ट्रासह देशातील विविध राज्यांमध्ये मानसिक आजारांचे प्रमाण वाढत असतानाही उपचार घेणाऱ्या रुग्णांचे प्रमाण मात्र चिंताजनकरीत्या कमी असल्याचे वास्तव समोर आले आहे. राष्ट्रीय मानसिक आरोग्य सर्वेक्षणानुसार मानसिक आरोग्य सेवांपर्यंत पोहोचण्यात राज्यनिहाय मोठी तफावत दिसून येत आहे.

महाराष्ट्र, उत्तर प्रदेश, बिहार, मध्य प्रदेश आणि राजस्थान या मोठ्या राज्यांमध्ये मानसिक आजारग्रस्तांची संख्या लक्षणीय असली तरी उपचार घेणाऱ्यांचे प्रमाण अत्यल्प आहे.



महाराष्ट्रात शहरी भागात काही प्रमाणात मानसोपचार सुविधा उपलब्ध असल्या तरी ग्रामीण आणि आदिवासी भागात उपचार यंत्रणा अपुरी ठरत आहे.

दक्षिण भारतातील केरळ, तामिळनाडू आणि कर्नाटक या राज्यांमध्ये मानसिक आरोग्याबाबत जनजागृतीचे प्रमाण तुलनेने जास्त असून उपचार घेणाऱ्यांची टक्केवारी इतर राज्यांच्या तुलनेत अधिक आहे. मात्र उत्तर भारतातील अनेक राज्यांमध्ये अजूनही मानसिक आजार म्हणजे सामाजिक कलंक अशी धारणा कायम आहे.तज्ज्ञांच्या मते, राज्य पातळीवर मानसोपचारतज्ज्ञ, समुपदेशक आणि मानसिक आरोग्य केंद्रांची संख्या अपुरी आहे. अनेक जिल्ह्यांमध्ये एकही पूर्णवेळ मानसोपचारतज्ज्ञ उपलब्ध नाही. परिणामी रुग्णांना खासगी उपचारांचा खर्च परवडत नाही आणि आजार वाढत जातो.

मानसिक आरोग्य सेवा प्राथमिक आरोग्य केंद्रांपर्यंत नेणे, राज्य आरोग्य योजनांमध्ये मानसोपचाराचा समावेश करणे आणि शालेय पातळीवर समुपदेशन व्यवस्था बळकट करणे गरजेचे असल्याचे मत तज्ज्ञ व्यक्त करत आहेत. अन्यथा येत्या काळात मानसिक आरोग्य हा राज्य सरकारांसाठी मोठा सामाजिक प्रश्न ठरण्याची शक्यता आहे.

स्माईल फाऊंडेशन या सामाजिक संस्थेने याबाबत जनजागृती कार्यक्रम करण्यावर भर दिला असून नवीन वर्षात मोफत मानसिक संतुलन शिबिर कार्यक्रम राबविणार असल्याचे सांगितले. एक स्माईल एक आयुष्य वाचवू शकते असे घोषवाक्य घेऊन जनजागृती कार्यक्रम होणार आहेत. असे संस्थेच्या सचिव स्नेहा शिंदे यांनी सांगितीले.

## सिल्लोडमध्ये 'शिवतेजा'चा जागर; अघोरी नृत्याच्या थराराने रसिक मंत्रमुग्ध!; छत्रपती शिवाजी विद्यालयाचे स्नेहसंमेलन गाजले

**योगेश पालोदकर/सिल्लोड :** विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना हक्काचे व्यासपीठ मिळवून देणाऱ्या शहरातील श्री छत्रपती शिवाजी विद्यालयाचा वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा शुक्रवार,दिं. ९ जानेवारी रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाला. शिवचरित्रातील जाज्वल्य इतिहास आणि अंगावर शहारे आणणाऱ्या 'अघोरी' नृत्याच्या सजीव अभिनयाने विद्यार्थ्यांनी उपस्थित हजारो प्रेक्षकांची मने जिंकली. प्राथमिक व माध्यमिक विभागाच्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या ५० हून अधिक मराठी व हिंदी गीतांच्या या भरगच्च कार्यक्रमाने सिल्लोडकरांना अविस्मरणीय सांस्कृतिक मेजवानी दिली.

या दिमाखदार सोहळ्याचे उद्घाटन सिल्लोड शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शेषराव उदार यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले.



अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक कृष्णा सपाटे होते. त्यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणातून विद्यालयाच्या आजवरच्या गौरवशाली शैक्षणिक व सामाजिक इतिहासाचा पट उलगडला.

प्रमुख पाहुणे म्हणून यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ . अशोक पंडित, आगारप्रमुख विजय कळवणे, सिल्लोड न्यायालयाचे न्यायाधीश श्री. किरमे, श्रीमती आढायके, केंद्रप्रमुख सदाशिव बडक, किशोर जगताप, बाबुराव गाडेकर, श्री. चव्हाण, प्राथमिक मुख्याध्यापक गजानन डमाळे व नगरपरिषद प्रशालेचे मुख्याध्यापक नारायण चव्हाण यांची उपस्थिती होती. उपस्थित मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे मुक्तकंठाने कौतुक केले.

विद्यालयाच्या दोन्ही विभागांच्या विद्यार्थ्यांनी रेकॉर्ड डान्स आणि नाटिकांचे उत्कृष्ट सादरीकरण केले. शिवचरित्रावर आधारित नाटिकेने प्रेक्षकांमधील राष्ट्रप्रेम जागवले, तर 'अघोरी' नृत्यातील जिवंत अभिनयाने अंगावर काटा आणला. रमेश परदेशी यांनी आपल्या खुमासदार शैलीत सूत्रसंचालन करून सोहळ्याची रंगत वाढवली.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सांस्कृतिक विभागाच्या श्रीमती संगीता तायडे, श्रीमती संगीता काळे, पंकज सावंत, नरेशसिंह राजपूत, अमोल पालोदकर, अमोल दांडगे, राजू गाढवे, भाऊसाहेब गावंडे, गणेश सुरडकर, रामेश्वर वाघ, शितल गीते, सुवर्णा तारो, मीरा पांगळे आणि सोनाली जाधव यांनी विशेष परिश्रम घेतले. या सोहळ्याला पालक, माजी विद्यार्थी आणि नागरिकांनी मोठी गर्दी केली होती.

## श्रीवर्धन येथे मनरेगाची तालुकास्तरीय अंकेक्षण सुनावणी संपन्न

**दैनिक युवक आधार**

**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी/अनिकेत मोहित :** श्रीवर्धन पंचायत समिती कार्यालयातील डॉ नानासाहेब धर्माधिकारी सभागृहात महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा) अंतर्गत तालुक्यात राबविण्यात आलेल्या विविध विकास कामांचे तालुकास्तरीय 43 ग्रामपंचायती मध्ये सामाजिक अंकेक्षण होऊन जनसुनावणी पार पडली.

या सुनावणी दरम्यान तालुक्यातील विविध ग्रामपंचायती मध्ये मनरेगा अंतर्गत झालेल्या कामांची तपासणी,खर्चाचा आढावा, मजुरी वितरण,कामांची गुणवत्ता,तसेच संबंधित नोंदीचे सामाजिक अंकेक्षण करण्यात आलेयोजनेत पारदर्शकता, उत्तरदायित्व व जनसहभाग वाढविण्याच्या दृष्टीने सामाजिक अंकेक्षणांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले,यावेळी आर्थिक वर्ष 2024/25 मध्ये झालेल्या कामाची तपासणी करण्यात



आली व यावर जन सुनावणी पॅनल यांनी निर्णय दिले. मजुरांना मजुरी व योजनेच्या लाभार्थी यांना योग्यवेळी लाभ कशी मिळेल यावर चर्चा झाली. सोबतच ग्रामपंचायत अधिकारी ,ग्रामरोजगार सेवक कृषी सहाय्यक यांनी आपापले अनुपालन सादर केले

या तालुकास्तरीय सामाजिक अंकेक्षण सुनावणीस गटविकास अधिकारी माधव जाधव,वकील सतीश जंजाळ पत्रकार संदीपभाऊ लाड विस्तार अधिकारी किशोर नागे महिला बचत गट सदस्य अनिता शिर्के जिल्हा समन्वयक प्रशांत दामले तांत्रिक अधिकारी तुषार पालवे उपस्थित होते.

## महाराष्ट्र लोक सेवा हक्क अधिनियम-2015

### अधिसूचित सेवांचा लाभ घेण्यासाठी नागरिकांनी ‘आपले सरकार’ पोर्टलचा वापर करावा - विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल यांचे आवाहन

**दैनिक युवक आधार**

**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम/गजानन पवार पाटील :** महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अन्वये नागरिकांना शासनाकडून प्रदान करण्यात येणाऱ्या विविध अधिसूचित सेवा विहित कालावधीत पारदर्शक, सुलभ व वेळेत उपलब्ध करून देण्याची तरतूद केली आहे. यानुषंगाने नागरिकांनी या सेवांचा लाभ घेण्यासाठी संबंधित शासकीय कार्यालयाशी संपर्क साधावा अथवा ऑनलाईन सेवेसाठी महाराष्ट्र शासनाच्या "आपले सरकार" या अधिकृत पोर्टलचा वापर करावा, असे आवाहन विभागीय आयुक्त डॉ. श्वेता सिंघल यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे केले आहे.या अधिनियमांतर्गत महसूल, ग्रामविकास, नगरविकास, सामाजिक न्याय, आरोग्य, शिक्षण इत्यादी विभागांमार्फत नागरिकांना देण्यात येणाऱ्या सेवा अधिसूचित करण्यात आलेल्या असून, त्या सेवा ठराविक कालमर्यादेत

लोकसेवा हक्क कायदा
Right to Public Service Act

देणे संबंधित शासकीय अधिकाऱ्यांना बंधनकारक आहे. लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत सेवा नाकारली गेल्यास किंवा विलंब झाल्यास नागरिकांना अपील करण्याची तरतूदही या अधिनियमात करण्यात आलेली आहे.शासनाच्या विविध कामकाजाबाबत नागरिकांच्या समस्यांचे प्रभावी व विहीत वेळेमध्ये निवारण होण्यासाठी महाराष्ट्र शासनाने "आपले सरकार" पोर्टलवर ऑनलाईन समस्या निवारण प्रणाली उपलब्ध करून दिली आहे. नागरिक आपल्या समस्या पोर्टलवर नोंदवू शकतात, ज्यावर संबंधित विभागातील सक्षम अधिकाऱ्यांना अधिनियमांतर्गत विहित कालावधीत कार्यवाही करून समस्या निकाली काढणे बंधनकारक करण्यात आले आहे.

या अधिनियमांतर्गत समस्या निवारणात दिरंगाई झाल्यास वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे अपील करण्याची सुविधा देखील उपलब्ध असून, यामुळे शासन व नागरिक यांच्यातील संवाद अधिक प्रभावी व उत्तरदायी होण्यास मदत होत आहे. अमरावती विभागातील अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलढाणा तसेच वाशिम या सर्व जिल्ह्यातील नागरिकांनी या सुविधेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन विभागीय आयुक्त डॉ. सिंघल यांनी केले आहे.

## देव भेटल तुजला,आपल्या घरी आई वडिलांच्या पावन चरणावरी

दुनियेत अनेक माणसं जन्माला येतात आणि जातात पण काही समाजात खूप असा आदर्श निर्माण करून जातात असेच एक आदर्श माता पिता श्री. आबासाहेब दशरथ आस्वर आणि सौ. शालन आबासाहेब आस्वर वाकी या लहानशा खेडेगावात राहणारे हे कुटुंब

पैकी वडील श्री आबासाहेब यांना प्रेमाने सर्वजण “नाना” म्हणतात आणि आईला “ताई” म्हणतात ताईंची अचूक जन्मतारीख माहित नसल्यामुळे, आम्ही नाना आणि ताई यांचा वाढदिवस एकाच दिवशी साजरा करतो असे चिरंजीव इंजिनियर किशोर यांनी सांगितले नानांच्या कुटुंबात १९९० साली, त्यांची आई कै. शांताबाई, पत्नी सौ. शालनबाई आणि आम्ही तिघे भाऊ — असे सर्वजण एका झोपडी मधे राहत होतो.नानांचे जीवन पाहिले तर, लहानपणीच वडील त्यांना सोडून गेले.त्या काळात दोन वेळचे अन्नसुद्धा मिळणे कठीण होते.अशा अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत, आमच्या आजींनी — म्हणजेच नानांच्या



आईने — गवत विकून नानांना मोठे केले.

आम्ही लहान असताना आई–वडील दोघांनी काळ्या आईची सेवा करत, कुटुंबाची संपूर्ण जबाबदारी समर्थपणे पेलली.पुढे आम्हा तिघा भावंडांचे शिक्षण, संसार आणि वैवाहिक जीवन सुरू होईपर्यंत,ते स्वतःसाठी कधीच जगले नाहीत — नेहमी आम्हालाच प्राधान्य दिले. एका छोट्या झोपडीत ३ सदस्यांपासून सुरू झालेला प्रवास,आज १३ सदस्यांपर्यंत येऊन पोहोचला आहे.या सर्वांना सामावून घेण्यासाठी, ताई आणि नाना यांच्या संकल्पनेतून उभे राहिलेले “वास्तू शांताई”,हे आजी, ताई आणि नाना यांच्या अथक कष्टांचे प्रतीक आहे,जिथे आज सर्वजण आनंदाने व सुखाने राहतात.आज,मोठा मुलगा गणेश व मोठी सून रेखा वहिनी शेती सांभाळतात.मधला मुलगा सतीश पोलीस निरीक्षक या पदावर बोईसर येथे कार्यरत असून, मधली सून अमृता या उत्कृष्ट गृहिणी आहेत.आणि मी स्वतः किशोर, सध्या पुण्यात वास्तव्यास असून Accenture मध्ये Associate Manager या पदावर कार्यरत आहे, तर लहान सून सौ. ज्योती या शिक्षिका म्हणून कार्यरत आहेत.

आज जरी आम्ही कामानिमित्त वेगवेगळ्या ठिकाणी राहत असलो,तरी गावी सर्वजण नाना आणि ताई यांच्या मायेखाली एकत्र आहोत.हा संपूर्ण प्रवास त्यांच्या कष्ट, चिकाटी, संयम आणि कुटुंबावरच्या अथांग प्रेमाचे जिवंत उदाहरण असून त्यांनी समाजात एक आगळावेगळा आदर्श निर्माण केला आहे नाना नेहमीच सामाजिक कार्यात सहभाग घेऊन समाजातील वेगवेगळ्या घटकांना मदत करत असतात, नुकताच दोघांचा 61 वा वाढदिवस अन्नदान करून साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी वेगवेगळ्या क्षेत्रातील अनेक मान्यवर मंडळी उपस्थित होते.

म्हणून म्हणावेसे वाटते देवतुल्य बाबा माझे देवतुल्य आई पूजा रोज करीत होतो त्यांची अन्य देव नाही पेटवून त्यांच्यापाशी दोन नेत्रज्योती लावूनिया पावन होतो चरणधूळ माथी सदा मागतो मी त्यांचे वरदहस्त डोई,आजच्या या पावन दिवशी,आई आणि वडील दोघांनाही वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

तुमचे भावी आयुष्य निरोगी, आनंदी आणि समाधानाने भरलेले जावो,आणि तुमचा आशीर्वाद आमच्यावर सदैव राहो,हीच ईश्वरचरणी प्रार्थना

**शब्दांकन सतीश शिंदे सर**

## अतिवृष्टीने खचलो, आता रस्त्याने नडलो! डोळंबा येथील शेतकऱ्यांची व्यथा

**दैनिक युवक आधार**

**दिग्रस प्रतिनिधी/उमेश साखरकर :** तालुक्यातील डोळंबा येथील शेतकऱ्यांनी आपल्या शेतात जाण्या-येण्यासाठी असलेल्या पारंपारिक पांदण रस्त्याच्या दुरवस्थेबाबत संताप व्यक्त केला आहे. शेतात जाण्यास रस्ताच उपलब्ध नसल्याने शेती मशागत आणि पीक काढणीत मोठ्या अडचणी येत असून, संतप्त शेतकऱ्यांनी दिग्रसचे तहसीलदार यांना लेखी निवेदन देऊन रस्ता दुरुस्त करण्याची मागणी केली आहे.

डोळंबा ते भंडारी या दरम्यान एक जुना



पांदण रस्ता नकाशावर उपलब्ध आहे. मात्र, सद्यस्थितीत या रस्त्याची अवस्था अत्यंत बिकट झाली आहे. रस्ता अरुंद आणि खड्ड्यांनी भरलेला असल्याने शेतकऱ्यांना बी-बियाणे, खते आणि शेतीसाठी लागणारी अवजारे वाहून नेणे अशक्य झाले आहे.

पर्यायी मार्ग नसल्याने, वादाचे प्रसंग घडत आहे शेतकऱ्यांनी निवेदनात नमूद केले आहे की, मुख्य पांदण रस्ता खराब असल्याने त्यांना दुसऱ्याच्या शेतातून जावे लागते. यामुळे संबंधित क्षेत्रातील शेतकऱ्यांशी वारंवार वादाचे प्रसंग उद्भवत असून भांडण-तंटे होत आहेत. रस्ता नसल्यामुळे शेतकरी मानसिकदृष्ट्या खचले असून, ही समस्या सुटली नाही तर शेती पडीक ठेवण्याची वेळ येईल, अशी भीती त्यांनी व्यक्त केली आहे.

महसूल विभागाने तातडीने या ठिकाणची प्रत्यक्ष पाहणी करून शासनाच्या विविध योजनांमधून हा पांदन रस्ता दुरुस्त करून वाहतुकिसाठी खुला करून द्यावा अशा मागणीचे निवेदन शेतकऱ्यांनी तहसिलदार व यांचे मार्फत

मृद व जलसंधारण मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. संजयभाऊ राठोड आणि दिग्रसचे गटविकास अधिकारी यांना पाठवण्यात आले. सोमा राठोड, किशोर राठोड ,शुभम जाधव ,श्रीराम जाधव,विजय जाधव , डोमा राठोड ,भगवान राठोड ,परसराम जाधव, अनिता पवार, हनुमंता पारधी ,पुष्पाबाई जाधव, यश कुंचटवार, मधुकर पारधी , सावित्रीबाई जाधव आदींनी निवेदन दिले आहे.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॉक, कलर व ४कलर प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# नागपूर महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शहरात पोलिसांचा रूट मार्च

## नागरिकांना दिला सुरक्षेचा विश्वास

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी ज्योत्सना करवाडे/विदर्भ प्रमुख :** आगामी नागपूर महानगरपालिका निवडणूक २०२५-२०२६ ची प्रक्रिया अत्यंत शांततेत आणि निर्भय वातावरणात पार पडावी, यासाठी नागपूर पोलीस सज्ज झाले आहेत. लोकांच्या मनात सुरक्षेची भावना निर्माण करण्यासाठी आणि जनजागृती करण्याच्या उद्देशाने , ९ जानेवारी रोजी पोलीस उप आयुक्त रशिमता राव एन. यांच्या मार्गदर्शनात अजनी आणि सक्करदरा विभागातील विविध भागांत भव्य 'रूट मार्च' काढण्यात आला.

सक्करदरा विभागातील रूट मार्च दुपारी १:४० वाजता नंदनवन पोलीस ठाण्यापासून सुरू झाला. हा मार्च मंगलमूर्ती चौक, बापू नगर, कबीर नगर, गुरुदेवनगर, ईश्वर नगर, कीर्ती नगर तसेच सक्करदरा पोलीस ठाणे परिसर, मोठा ताजबाग, बुलंद गेट, बीडी पेठ, इमामवाडा, जाटतरोडी आणि रामबाग यांसारख्या प्रमुख भागातून फिरून दुपारी ३:३० वाजता समाप्त झाला. यावेळी पोलीस उप आयुक्त रशिमता राव यांनी स्वतः उपस्थित राहून पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले. या संचलनात सपोआ प्रदीप शिरस्कर यांच्यासह १२ अधिकारी, ४५ पोलीस अंमलदार आणि आरसीपी पथक सहभागी झाले होते.

दुसरीकडे, अजनी विभागात दुपारी १२:२५ वाजता हुडकेश्वर पोलीस ठाण्यापासून रूट मार्चला सुरुवात करण्यात आली. पिपळा रोड, संजय गांधी नगर, भोले नगर, अन्नपूर्णा नगर, न्यू नेहरूनगर आणि म्हाळगी नगर चौक या भागात पोलिसांनी संचलन केले. या मार्चचे नेतृत्व सपोआ नरेंद्र हिवरे यांनी केले असून यात ६ अधिकारी आणि ४० अंमलदारांचा ताफा सामील होता.

दोन्ही विभागांतील रूट मार्च दरम्यान पोलिसांनी पी.ए. सिस्टीमद्वारे (भोंग्याद्वारे) नागरिकांशी संवाद साधून जनजागृती केली. निवडणूक काळात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस प्रशासन सज्ज असून नागरिकांनी सहकार्य करावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

# भूसंपादनाशिवाय रस्ता रुंदीकरण म्हणजे शेतकऱ्यांच्या पोटावर घाला!

## त्र्यंबकेश्वर–पिंपळगाव–दिंडोरी बायपास अन्यायाविरोधात साखळी उपोषणाला मनसेचा जाहीर पाठिंबा

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी – कृष्णा गायकवाड (पिंपळगाव बसवंत) :** त्र्यंबकेश्वर–पिंपळगाव बसवंत व्हाया दिंडोरी बायपास हा सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी प्रस्तावित असला , तरी आवश्यक भूसंपादन न करता थेट रस्ता रुंदीकरणाचा घाट घातला जात आहे. "रस्ता जिल्हा मार्गावरून राज्य मार्ग झाला, शासकीय आदेश अंतिम" असा दावा करून शेतकऱ्यांच्या मालकीच्या जमिनीवर अतिक्रमण



करण्याचा हा प्रकार म्हणजे अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या उपजीविकेवर थेट घाला आहे.

पालखेड बंधारा, लोखंडेवाडी, जोपूळ व चिंचखेड येथील आधीच विविध प्रकल्पांमुळे बाधित झालेले अल्पभूधारक शेतकरी या अन्यायाविरोधात साखळी उपोषण आंदोलन करत आहेत.

शासन व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या (PWD) या अन्यायकारक भूमिकेविरोधात आता राजकीय पातळीवरही ठाम विरोध व्यक्त होत आहे.

या आंदोलनाला महाराष्ट्र नवनिर्माण सेनाच्या नाशिक जिल्हा उपाध्यक्ष मनोज ढिकले यांच्या वतीने जाहीर पाठिंबा देण्यात आला आहे.

मनसेच्या वतीने स्पष्ट करण्यात आले की, कायदेशीर भूसंपादन, योग्य मोबदला व शेतकऱ्यांची लेखी संमती घेतल्याशिवाय कोणतेही रुंदीकरण स्वीकारले जाणार नाही. अन्यथा आंदोलन अधिक तीव्र केले जाईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

"विकासाच्या नावाखाली शेतकऱ्यांचे हक्क पायदळी तुडवणाऱ्या निर्णयांना आम्ही कदापि समर्थन देणार नाही,"

अशी ठाम भूमिका आंदोलनकर्त्यांनी मांडली. प्रशासनाने तात्काळ भूसंपादन प्रक्रिया पारदर्शकपणे राबवून शेतकऱ्यांना न्याय द्यावा, अन्यथा जनआंदोलन उभारले जाईल, असा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

# "ईश्वरनामानेच संकटांवर मात करण्याची ताकद मिळते" – ह.भ.प. गोविंद महाराज पवार

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी | आष्टी/बाळासाहेब रकटाटे :** ईश्वराचे नामस्मरण हेच माणसाच्या जीवनातील खरे बळ आहे. आयुष्यात येणाऱ्या संकटांना, दुःखांना व अडचणींना सामोरे जाण्याची शक्ती ईश्वरनामामुळेच प्राप्त होते. माणसाचे संपूर्ण जीवन प्रारब्धावर आधारित असते. प्रत्येक गोष्टीला प्रारब्ध ठरलेले असते—दगडाला, मातीला जसे प्रारब्ध असते, तसेच माणसालाही असते. त्या प्रारब्धानुसारच जीवनातील घटना घडत जातात, त्यात कोणालाही बदल करता येत नाही. मात्र, आपल्या हातात असलेले श्रेष्ठ कर्म म्हणजे आई-वडिलांची निःस्वार्थ सेवा होय, असे भावपूर्ण प्रतिपादन ह. भ.प.गोविंद महाराज पवार यांनी केले.अंभोरा येथे कै.उत्तमराव शामराव थोरात यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त आयोजित प्रवचन सोहळ्यात ते बोलत होते. दिनांक १० जानेवारी २०२६ रोजी हा पुण्यस्मरण कार्यक्रम भक्तिभाव, श्रद्धा आणि अध्यात्मिक वातावरणात पार पडला.



प्रवचनात बोलताना ह. भ. प. गोविंद महाराज पवार म्हणाले की, आजच्या धकाधकीच्या जीवनात माणूस सर्व काही मिळवण्याच्या नादात आई-वडिलांकडे दुर्लक्ष करत आहे. आई जशी मायेने लेकरांसाठी सर्वस्व अर्पण करते, तसेच वडीलही आयुष्यभर कुटुंबासाठी कष्ट करत असतात. मात्र बाप आपल्या वेदना कधीच व्यक्त करत नाही. तो रडत नाही, पण मनातल्या मनात अनेक दुःखांना सामोरे जात असतो. विशेषतः मुलीला सासरी पाठवताना बापाच्या मनातील भावनांची कल्पनाही करता येत नाही. त्या क्षणी बापाचे हृदय किती जड झालेले असते, हे प्रत्येकाने समजून घेतले पाहिजे, असे त्यांनी भावनिक शब्दांत सांगितले.ते पुढे म्हणाले की, माणसाला बाप जिवंत असताना त्याचे महत्त्व कळत नाही. मात्र जेव्हा बाप या जगातून निघून जातो, तेव्हाच त्याच्या त्यागाची, कष्टांची आणि प्रेमाची खरी जाणीव होते. त्यामुळे आई-वडील हयात असतानाच त्यांची सेवा करणे, त्यांचा मान-सन्मान राखणे आणि त्यांच्या सुख-दुःखात सहभागी होणे, हेच खरे धर्मकर्म आणि खरे पुण्य आहे, असे त्यांनी ठामपणे सांगितले.या पुण्यस्मरण कार्यक्रमाचे आयोजन थोरात कुटुंबीयांच्या वतीने करण्यात आले होते. कार्यक्रमाला गावातील विविध मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, ज्येष्ठ नागरिक, महिला वर्ग तसेच मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. प्रवचनादरम्यान संपूर्ण परिसर भक्तीरसात न्हाऊन निघाला होता. अनेक श्रोत्यांच्या डोळ्यांतून अश्रू तरळले, तर अनेकांनी या विचारांवर आत्मपरीक्षण करण्याचा संकल्प केला.

# समाजसेवेचा आदर्श की तरुणाईचा प्रेरणास्रोत? मातेरेवाडीत जिजाऊपुत्र किशोर दुगजे यांचा वाढदिवस जल्लोषात!

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी- कृष्णा गायकवाड (पिंपळगाव बसवंत) :** मातेरेवाडी (दिंडोरी)९ जानेवारी २०२६ रोजी मातेरेवाडी येथील तरुण वर्गाने मोठ्या उत्साहात जिजाऊ फॉर्मचे संचालक व समाजसेवक किशोर पुजाराम दुगजे यांचा वाढदिवस साजरा केला.

विक्रांत आप्पा सूर्यवंशी यांनी दिलेल्या अधिक माहितीनुसार या आनंद उत्साहात फटाक्यांचा जल्लोष, आनंदाचे वातावरण आणि तरुणांची लक्षणीय उपस्थिती— हा उत्सव केवळ वाढदिवसाचा होता की समाजकार्याच्या



गौरवाचा?

अनाथ आश्रम व वृद्धाश्रमांना प्रत्यक्ष भेटी देत मदतीचा हात देणारा हा तरुण उद्योजक केवळ नावापुरता समाजसेवक आहे का, की कृतीतून माणुसकी जपणारा खरा समाजभूषण? गरजूंसाठी वेळ, साधनं आणि संवेदना—याचा आदर्श त्यांनी कसा घालून दिला?

गावातील नागरिकांना विविध प्रकारे मदत करताना त्यांनी निर्माण केलेला विश्वास हा सहज मिळतो का? की सातत्य, प्रामाणिकपणा आणि सेवाभावातून उभा राहिलेला हा जनसंपर्क आज तरुणांना एकत्र आणतो आहे?त्यांच्या कार्यामुळे अनेक तरुण संपर्कात येऊन सामाजिक उपक्रमात सक्रिय होत आहेत—हा केवळ वाढदिवशीचा उत्साह की दीर्घकाळ टिकणारा जनसुदाय? नेतृत्व कौशल्यामुळे प्रेरणा घेणारी ही तरुणाई उद्याच्या समाजाचे चित्र बदलू शकते का?समाजकार्य आणि उद्योजकतेचा संगम साधत प्रेरणास्थान निर्माण करणारा हा प्रवास पुढे कुठवर जाणार? मातेरेवाडीतील हा जल्लोष भविष्यातील मोठ्या सामाजिक परिवर्तनाची नांदी ठरेल का—हा प्रश्न आज सर्वांनाच विचार करायला लावतो.

# रोटरी क्लब ऑफ नागपुर होरायझन की बैठक में साइबर अपराध पर जागरूकता

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी राहुल मडावी नागपूर :** रोटरी क्लब ऑफ नागपुर होरायझन (RCNH) की 7 जनवरी 2026 को आयोजित पखवाड़े की बैठक अत्यंत रोचक और ज्ञानवर्धक रही। बैठक में साइबर अपराध एवं डिजिटल अरेस्ट जैसे गंभीर विषय पर विस्तृत मार्गदर्शन किया गया।



इस अवसर पर एपीआई भिसे, पुलिस सिपाही तनय (तनमय) तथा पीआई योगेश घारे ने सरल भाषा में विभिन्न प्रकार के साइबर अपराधों एवं उनके कार्य करने के तरीकों (मोडस ऑपरेंडी) को समझाया। वक्ताओं ने बताया कि डर का माहौल ही साइबर ठगी का सबसे बड़ा कारण है।

उन्होंने मोबाइल हैक होने के लक्षण, आवश्यक क्या करें और क्या न करें, तथा यह जानकारी दी कि यदि धोखाधड़ी की सूचना तुरंत पुलिस को दी जाए तो ठगे गए पैसे की वापसी संभव है। सदस्यों को विशेष रूप से 1930, राष्ट्रीय साइबर अपराध हेल्पलाइन नंबर, पर तुरंत संपर्क करने की सलाह दी गई।

वक्ताओं ने सरकारी वेबसाइट जैसी दिखने वाली फर्जी वेबसाइटों से सावधान रहने तथा उनकी पहचान करने के तरीकों पर भी प्रकाश डाला। साथ ही बताया कि अपराधी अक्सर फर्जी ऐप या APK फाइल इंस्टॉल करवा कर मोबाइल का नियंत्रण हासिल करते हैं। सभी से आग्रह किया गया कि व्हाट्सएप की सेटिंग में जाकर ऑटो-डाउनलोड बंद रखें।

मुख्य संदेश :

सतर्क और सजग रहें

अज्ञात लिंक या ऐप न खोलें

संदेह होने पर वाई-फाई और मोबाइल डेटा बंद करें

तुरंत पुलिस को सूचना दें – 1930 पर कॉल करें

कार्यक्रम की अध्यक्षता रोटेरियन डॉ. सुधीर मंगरुलकर, अध्यक्ष, रोटरी क्लब ऑफ नागपुर होरायझन ने की। सचिव रोटेरियन डॉ. (श्रीमती) मृणालिनी बल्लाल ने कार्यक्रम का संचालन एवं आभार प्रदर्शन किया।

इस अवसर पर पीडीजी रोटेरियन प्रफुल्ल मोखदम एवं सीए अवजीत मिश्रा का जन्मदिन केक काटकर मनाया गया। उपस्थित सदस्यों ने कार्यक्रम की सराहना करते हुए परिवार, मित्रों एवं समाज में साइबर जागरूकता फैलाने का संकल्प लिया।

पीआई योगेश घारे ने नागपुर के सभी 19 रोटरी क्लबों के साथ संयुक्त साइबर अपराध एवं डिजिटल अरेस्ट जागरूकता कार्यक्रम आयोजित करने का प्रस्ताव रखा, जिसका सदस्यों ने स्वागत किया।

# प्रभाग क्रमांक १२३ चे महायुतीचे उमेदवार अनिल निर्मळे यांच्या प्रचारार्थ डॉ.प्रितम मुंडे यांचा नागरिकांशी घरोघरी जाऊन संवाद

## अनिल निर्मळे यांना विजयी करण्याचे आवाहन

**दैनिक युवक आधार**

**घाटकोपर,(केतन भोज) :** प्रभाग क्रमांक १२३ चे भाजप शिवसेना रिपाई महायुतीचे अधिकृत उमेदवार अनिल निर्मळे यांच्या प्रचारार्थ बीड जिल्ह्याच्या माजी खासदार डॉ.प्रितम मुंडे यांनी महायुतीचे उमेदवार अनिल निर्मळे यांच्या समवेत प्रभाग क्रमांक १२३ मधील नागरिकांच्या घरोघरी जाऊन डोअर टू डोअर संवाद साधून भारतीय जनता पार्टी आणि महायुतीचे उमेदवार अनिल निर्मळे यांना विजयी करण्याचे आवाहन केले.तसेच यावेळी डॉ.प्रितम मुंडे यांनी प्रभागातील मतदार नागरिकांशी संवाद साधला.यावेळी त्यांच्या सोबत मुंबई भाजप सचिव प्रतिक कर्पे,मंडळ अध्यक्ष संतोष गांजले,वॉर्ड अध्यक्ष महेश गुप्ता,शिवसेना समन्वयक मंगेश मोहिते आणि महायुतीचे स्थानिक कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# नेरे येथील किशन खारके राष्ट्रीय नेमबाज ठरला सेंटर फायर पिस्तूल शूटिंगमधील पहीला रायगड जिल्हा व नवी मुंबईचा विख्यात (रिनॉन्ड शूटर) नेमबाज

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर :** 17 डिसेंबर ते 4 जानेवारी 2026 दरम्यान डॉ. कर्णिसिंग शूटिंग रेंज 68 वि राष्ट्रीय नेमबाजी स्पर्धा संपन्न झाली. या स्पर्धेत सिद्धांत रायफल क्लबचा नेमबाज किशन खारके यांनी 535 गुण संपादन करून सेंटर फायर पिस्तूलमध्ये विख्यात नेमबाज (रिनॉन्ड शूटर) होण्याची पदवी संपादन केली. या स्पर्धेत क्लबचे नेमबाज जयंत साळवे मुंबई यानी 25 मीटर सेटर फायर पिस्तूल मध्ये विख्यात नेमबाज होण्याची पदवी संपादन केली तसेच 10 मीटर पिस्तूल शूटिंगमध्ये सुप्रिता सुबुद्धी 558 गुण संपादन करून भारतीय ट्रायलसाठी निवड झाली. हे सर्व सिद्धांत रायफल क्लबच्या ईंडियन मॉडेल स्कूल ॲण्ड ज्युनियर कॉलेज येथे अलंकार कोळी, किशन खारके, जयंत साळवे आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक स्वत: व इतर नेमबाज यांच्यासाठी प्रशिक्षणही देत आहेत.



या यशाबद्दल क्लबचे अध्यक्ष विजय खारकर, सचिव किशन खारके, प्रितम पाटील, महेश फूलोरे नगरसेवक अंबरनाथ, समाधान घोपरकर सरपंच दापोली, अजिंक्य चौधरी काटई, किरण माळी, अविनाश भगत, सुरज थळे, सागर भोईर, किरण मोहिते, निलेश भगत, प्रकाश दिसले, हेमंत भगत, संदेश पाटील, जगदीश पाटील, शैलेश पाटील, जयदास पाटील, अर्जुन पाटील, संतोष फडके, जितेश पाटील, राजू मुंबईकर समीर आंबवने, नंदकुमार मुंबईकर तसेच क्लबचे सदस्य व मित्र परिवार व ग्रामस्थ नेरे यांनी पुढील राष्ट्रीय नेमबाज स्पर्धेकरिता अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# विठ्ठल पुलवळे (कोतवाल) यांचा सेवापूर्ती गौरव सोहळा साकत येथे उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी) :** साकत येथे साहित्यरत्न प्रतिष्ठानच्या वतीने श्री.विठ्ठल मारुती पुलवळे (कोतवाल) यांच्या सेवापूर्ती निमित्त आयोजित करण्यात आलेला भव्य गौरव सोहळा रविवारी, दिनांक ०४ जानेवारी २०२६ रोजी साकत, ता. जामखेड, जि.आहिल्यानगर येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या सेवापूर्ती गौरव सोहळया निमित्त सायंकाळी ह.भ.प. विनोदाचार्य पांडुरंग महाराज उगले (परभणी) यांचे भव्य दिव्य कीर्तन झाले. कीर्तनाने संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाले होते. कीर्तनानंतर उपस्थित भाविक भक्त, मान्यवर व ग्रामस्थांसाठी स्नेह भोजनाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास ह.भ.प. उत्तम महाराज वराट (साकत) यांचे शुभाशीर्वाद लाभले. कार्यक्रमाचे आयोजन साहित्यरत्न




प्रतिष्ठानचे मुख्य सचिव श्री.अमोल विठ्ठल पुलवळे यांनी केले होते. श्री.विठ्ठल मारुती पुलवळे यांनी तलाठ्यांच्या मार्गदर्शनाखाली कोतवाल म्हणून दीर्घकाळ सेवा बजावली. व वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले. त्यांच्या सेवेचा आढावा घेतला असता ते केवळ एक शासकीय कर्मचारी नसून गावकारभाराचा विश्वासार्ह आधारस्तंभ असल्याचे स्पष्ट होते. कोतवाल हे पद अनेकदा दुर्लक्षित राहते; मात्र प्रशासन आणि नागरिक यांच्यातील महत्त्वाचा दुवा म्हणून या पदाची भूमिका अत्यंत मोलाची आहे.नोटीस पोहोचवणे, शासकीय आदेशांची अंमलबजावणी करणे, आपत्कालीन प्रसंगी प्रशासनास सहकार्य करणे तसेच गावातील शांतता व शिस्त राखणे या सर्व जबाबदाऱ्या श्री.विठ्ठल पुलवळे यांनी प्रामाणिकपणे, निष्ठेने व जबाबदारीने पार पाडल्या. त्यांच्या कार्यशैलीत नम्रता, वेळेचे भान आणि जबाबदारीची जाणीव कायम दिसून येत असे, सेवानिवृत्तीच्या निमित्ताने श्री.विठ्ठल पुलवळे यांच्या कार्याला केवळ औपचारिक निरोप न देता, मनापासून कृतज्ञतेचे अभिवादन करण्यात आले. त्यांच्या अनुभवातून पुढील पिढीतील कर्मचाऱ्यांना प्रेरणा मिळेल, अशी अपेक्षा या वेळी व्यक्त करण्यात आली. या गौरव सोहळयास मराठी दूरचित्रवाणी क्षेत्रातील नामवंत कलाकारांची विशेष उपस्थिती लाभली. या मध्ये मा.गिरीश परदेशी, मा.डॉ.सतीश सूर्यवंशी आदी कलाकारांचा समावेश होता. त्यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाची रंगत अधिक वाढली. या कार्यक्रमासाठी अनेक मान्यवर व अधिकारी उपस्थित होते. त्या मध्ये पंचायत समितीचे सभापती संजय वराट, कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती कैलास वराट, पंचायत समितीचे सभापती डॉ.भगवान मुरूमकर, साकत ग्राम पंचायतीचे माजी सरपंच कांतीलाल वराट, हरिभाऊ मुरूमकर, ग्राम पंचायत सदस्य सागर मुरूमकर, शहादेव वराट, कृषी अधिकारी सुरेश भाऊ वराट, प्रमोद मुरूमकर, साकत गावचे सरपंच ऋषिकेश पाटील, उपसरपंच राजभाऊ वराट, पाटोद्याचे सरपंच गफ्फार पठाण, पाटोदा नगर पंचायतचे सभापती किशोर आडागळे, पोलीस पाटील महादेव वराट तसेच श्री साकेश्वर विद्यालयाचे मुख्याध्यापक भरत लहाने सर यांची प्रमुख उपस्थिती होती.

# माहूर येथे मुस्लिम तबलिगी जमात इज्तेमा संपन्न



**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी /सय्यद इसा :** माहूर हिमायतनगर व किनवट या ३ तालुक्यांतील मुस्लिम समाजाच्या तबलिगी जमातीतर्फे २ दिवसीय इज्तेमाचे आयोजन दि. ९ व १० जानेवारी रोजी माहूरमधील मोवाळा तलाव परिसरात करण्यात आले आहे. या इज्तेमासाठी तिन्ही तालुक्यांतील हजारो मुस्लिम बांधव उपस्थित होते, मुस्लिम धर्मातील धर्म गुरु यांनी धर्माचे शिकवण आणि कुराण पठण करून नमाज अदा केली सर्वांनी देशात शांतता व सुव्यवस्था निर्माण व्हावी यासाठी सामूहिकरीत्या प्रार्थना केली. इज्तेमाच्या यशस्वी आयोजनासाठी भव्य मंडप उभारणी, रस्ते व्यवस्था, वीज पुरवठा, जेवणासाठी स्वतंत्र झोन, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, वजूखाने, शौचालये तसेच इतर आवश्यक सोयीसुविधांची कामे गेल्या १५ दिवसांपासून दिवसरात्र परिश्रम करून पूर्ण केली होती . या सर्व कामांमध्ये मुस्लिम समाजातील शहरी व ग्रामीण भागातील नागरिकांनी हजेरी लावली होती.

# वावोशी भीमनगर येथे टाटा स्टील फाउंडेशन तर्फे महिलांसाठी डिजिटल लिटरसी प्रशिक्षण

**दै युवक आधार**

**खालापूर/संतोष शेवाळे :** टाटा स्टील फाउंडेशनच्या महिला सक्षमीकरण उपक्रमांतर्गत वावोशी भीमनगर येथे महिलांसाठी दि. ५ व ६ जानेवारी रोजी दोन दिवसीय डिजिटल लिटरसी प्रशिक्षण कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला. या प्रशिक्षणात परिसरातील तब्बल ३० महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत डिजिटल साक्षरतेकडे महत्त्वपूर्ण पाऊल टाकले.




महिलांना डिजिटल तंत्रज्ञानाबाबत सक्षम बनवणे, शासकीय योजनांचा स्वतःहून लाभ घेता यावा तसेच दैनंदिन जीवनात मोबाईलचा सुरक्षित व प्रभावी वापर करता यावा, हा या प्रशिक्षणाचा मुख्य उद्देश होता. टाटा स्टील फाउंडेशनच्या फिल्ड कोऑर्डिनेटर करूणा कदम यांनी प्रशिक्षणामागील भूमिका स्पष्ट करताना सांगितले की, "आज महिलांचे आर्थिक स्वावलंबन वाढत असताना डिजिटल व तांत्रिक साक्षरता ही काळाची गरज बनली आहे. योग्य माहिती आणि तंत्रज्ञानाचा वापर केल्यास महिलांना कोणावरही अवलंबून राहावे लागणार नाही." यावेळी या प्रशिक्षणादरम्यान डिजिलॉकर, मेरा रेशन, ई-आधार, आयुष्यमान भारत योजना यांसह सायबर सुरक्षितता व मोबाईल सेफ्टीबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. तसेच चाटजिपिटी व जेमिनी यांसारख्या आधुनिक डिजिटल साधनांच्या सहाय्याने शासकीय अर्ज कसे लिहावेत याचे प्रात्यक्षिक देण्यात आले. यासोबतच स्त्री–पुरुष समानता या विषयावरही महिलांमध्ये जागृती करण्यात आली. प्रशिक्षक रंजना राणे यांनी प्रत्यक्ष महिलांच्या मोबाईलमध्ये आवश्यक ॲप्स डाउनलोड करून त्यांचा वापर कसा करायचा, हे प्रात्यक्षिकाद्वारे समजावून सांगितले. त्यामुळे महिलांना डिजिटल ॲप्स वापरण्याचा आत्मविश्वास प्राप्त झाला.

या प्रशिक्षणामुळे महिलांमध्ये डिजिटल आत्मनिर्भरतेची जाणीव निर्माण झाली असून, भविष्यात अशा उपक्रमांमुळे महिला अधिक सक्षम होतील असा विश्वास उपस्थित महिलांनी व्यक्त केला.

# निवडणूकीबाबत सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी निष्पक्ष व पारदर्शी राहून काम करावे : निवडणूक अधिकारी तथा आयुक्त मंगेश चितळे

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर) :** महापालिका सार्वत्रिक निवडणूक 2025 -26 च्या अनुषंगाने निवडणूक कामी नेमणूक झालेल्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या कामात कोणताही हलगर्जीपणा सहन केला जाणार नाही, त्यांनी अत्यंत दक्षतेने निष्पक्ष व पारदर्शी राहून काम करावे अशा कठोर शब्दांत सूचना निवडणूक अधिकारी तथा आयुक्त मंगेश चितळे यांनी दिल्या.

महापालिका सार्वत्रिक निवडणूक 2025 -26 च्या पार्श्वभूमीवर क्षेत्रिय अधिकारी, भरारी पथक प्रमुख, स्थायी निगरानी पथक प्रमुख व व्हिडिओग्राफी



निगराणी पथक अशा सर्व पथकाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांची बैठक आज महापालिका मुख्यालयात घेण्यात आली, याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी आचारसंहिता कक्ष प्रमुख तथा अतिरीक्त आयुक्त महेशकुमार मेघमाळे, खर्च संनियंत्रण कक्ष प्रमुख अधिकारी मंगेश गावडे, निवडणूक विभाग उपायुक्त नानासाहेब कामठे, आचारसंहिता कक्ष पथक समन्वयक रवीकिरण घोडके, खर्च संनियंत्रण कक्ष समन्वयक निलेश नलावडे, नोडल अधिकारी सुबोध ठाणेकर, रुपाली माने, सर्व निवडणूक कार्यालयाचे सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी उपस्थित होते. शासनाने क्षेत्रिय अधिकारी, भरारी पथक प्रमुख, स्थायी निगरानी पथक प्रमुख व व्हिडिओग्राफी निगरानी पथक प्रमुखांना विशेष कार्यकारी दंडाधिकारी म्हणून घोषित करण्यात आल्याने निवडणूकीचे काम करताना अधिकारी व कर्मचाऱ्यांनी कोणत्याही दबावाला, अमिषाला बळी न पडता दक्ष राहून काम करावे , सर्व कामकाजाचे दस्तऐवजीकरण करून, उमेदवारांच्या होणाऱ्या खर्चावरही लक्ष ठेवावे, खर्चाच्या सर्व नोंदी काटेकोरपणे करव्यात अशा सूचना यावेळी आयुक्तांनी दिल्या. आदर्श आचारसंहितेची पालन होते की नाही , कसे होते या संदर्भात सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी जागरूकतेने काम करावे असेही यावेळी त्यांनी सांगितले.

विशेष कार्यकारी दंडाधिकारी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ (सन २०२३ चा ४६) च्या कलम १५ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून महाराष्ट्र शासनाच्यावतीने राज्यातील संबंधित जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, यांनी महाराष्ट्र महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या प्रयोजनार्थ नियुक्त केलेले क्षेत्रिय अधिकारी, भरारी पथक प्रमुख, स्थायी निगरानी पथक प्रमुख व व्हिडिओग्राफी निगरानी पथक प्रमुख यांना दि.१५/१२/२०२५ ते दि.१६/०१/२०२६ पर्यंत, याद्वारे, विशेष कार्यकारी दंडाधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे. त्यांना भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ च्या कलम १४८, १५२,१६२ व १६३ अंतर्गत कार्यकारी दंडाधिकाऱ्याचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत.



**अरण - श्री संत शिरोमणी सावता महाराज समाधी मंदिर तिर्थक्षेत्र अरण येथे भेट दिली असता श्री संत शिरोमणी महाराज यांच्या मुलींचे १९ वे वंशज दादा महाराज वसेकर व रविकांत महाराज वसेकर यांनी आष्टी तालुका युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष अविनाश कदम, नाभिक संघटनेचे अध्यक्ष प्रवीण कदम, पत्रकार मारूती सत्रे, बाबासाहेब कदम, कैलास कदम यांचे श्रीफळ देऊन स्वागत केले.**

**(बीड आष्टी प्रतिनिधी मारुती सत्रे)**

# महापारेषण राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत छत्रपती संभाजीनगर परिमंडळ अजिंक्य

## नागपुरात बक्षीस वितरण सोहळा उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी सतीश कडू/नागपूर:** महापारेषणच्या आंतर परिमंडळीय राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेचा (२०२५-२६) बक्षीस वितरण सोहळा काटोल रोडवरील पोलीस कवायत मैदानावर नुकताच उत्साहात संपन्न झाला. या स्पर्धेत सर्वच क्रीडा प्रकारांत उत्कृष्ट कामगिरी करत अति उच्च दाब संचलन व सुव्यवस्था (अऊदासवसु) परिमंडळ, छत्रपती संभाजीनगर संघाने सर्वसाधारण जेतेपद पटकावले, तर कराड परिमंडळाने उपविजेतेपद प्राप्त केले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महापारेषणचे संचालक (संचलन) सतीश चव्हाण होते. प्रमुख पाहुणे म्हणून मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी भरत पाटील उपस्थित होते. नागपूर परिमंडळाचे मुख्य




अभियंता तथा क्रीडा आयोजन समितीचे अध्यक्ष सतीश अणे यांनी प्रास्ताविक केले. यावेळी महापारेषणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार (भा.प्र.से.) यांनी खेळाडूंच्या खिलाडूवृत्तीचे कौतुक करून त्यांचे अभिनंदन केले.

आपल्या अध्यक्षीय भाषणात सतीश चव्हाण यांनी उत्कृष्ट आयोजनाबद्दल नागपूर परिमंडळाचे अभिनंदन केले. ते म्हणाले की, नव्याने रुजू झालेले कर्मचारी आणि अधिकारी यांचा खेळाचा दर्जा वाखाणण्याजोगा आहे. खेळामुळे शिस्त आणि संयम अंगी बाणतो. खेळाडूंच्या मागणीनुसार, दरवर्षी क्रीडा स्पर्धा आयोजित करण्याबाबत व्यवस्थापन सकारात्मक असल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

या सोहळ्यात येत्या दोन वर्षांत सेवानिवृत्त होणाऱ्या खेळाडूंचा विशेष सत्कार करण्यात आला. पुढील स्पर्धेचे यजमानपद पुणे परिमंडळाकडे सोपवण्यात आले असून क्रीडाध्वजाचे हस्तांतरण पुणे परिमंडळाकडे करण्यात आले. याप्रसंगी मुख्य अभियंता महेश भागवत, संजीव भोळे, माणिक गुट्टे, जयंत विके आणि श्रीमती शिल्पा कुंभार यांची प्रमुख उपस्थिती होती.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. अंकिता खानोरकर, सौ. मिनल बडवाईक आणि श्री. प्रांजय पाटील यांनी केले.

# प्रभाग क्रमांक १४ मध्ये महायुतीच्या उमेदवारांना मतदारांचा अभूतपूर्व प्रतिसाद

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** पनवेल महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रभाग १४ मधील भाजप महायुती उमेदवारांच्या प्रचारार्थ आयोजित करण्यात आलेल्या रॅलीत माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी महायुतीचा विजय निश्चित असल्याचे ठामपणे सांगितले. या परिसरात ज्येष्ठ नागरिक आणि तरुणांचा पाठिंबा महायुतीच्या उमेदवारांना मिळत आहे. ताफ्यामुळे सर्व उमेदवार प्रचंड मताधिक्याने विजयी होतील, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. खांदा वसाहत येथे झालेल्या या जोरदार प्रचारादरम्यान



प्रभाग १४ चे उमेदवार इकबाल हुसेन काझी, सारिका अतुल भगत, सतीश दत्तात्रेय पाटील आणि रेणुका मयुरेश नेतकर यांच्यासाठी लोकनेते रामशेठ ठाकूर व भाजपचे ज्येष्ठ नेते जे. एम. म्हात्रे यांनी मतदारांशी संवाद साधला. महायुती केवळ विकासाच्या मुद्यावर निवडणूक लढवत असून, हे चारही उमेदवार आपल्या परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध आहेत, असे आश्वासन त्यांनी दिले. तसेच येत्या १५ तारखेला 'कमळ' या चिन्हासमोरील बटण दाबून महायुतीच्या सर्व उमेदवारांना भरघोस मतांनी विजयी करण्याचे आवाहन त्यांनी नागरिकांना केले. प्रचारादरम्यान ठिकठिकाणी महिलांनी उमेदवारांचे औक्षण करून स्वागत केले आणि विजयाचा आशीर्वाद दिला. यावेळी , पनवेल पंचायत समितीच्या माजी सदस्या रत्नप्रभा घरत, वर्षा ठाकूर, माजी नगरसेवक मुकीत काझी, गणपत म्हात्रे, माजी नगरसेविका हेमतला म्हात्रे, जिल्हा उपाध्यक्ष मयुरेश नेतकर, जितेंद्र म्हात्रे, आरपीआयचे शहराध्यक्ष निलेश सोनावणे यांच्यासह महायुतीचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण पनवेल महानगरपालिका क्षेत्रात महायुतीचा प्रचार आता वेगवान झाला असून, खांदा वसाहतीमध्ये जोरदार शक्तीप्रदर्शन करत प्रचार करण्यात आला.

# परखंदे वाडीत धनगर समाजाला अहिल्याबाई होळकर सभागृहासाठी मिळाली हक्काची जागा राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) खालापूर यांचा पुढाकार

**दैनिक.युवक आधार**

**खालापूर/संतोष शेवाळे :** परखंदे वाडी परिसरातील धनगर समाजासाठी पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या नावाने सभागृह उभारण्यासाठी खरेदी करण्यात आलेल्या भूखंडाचे भूमिपूजन होताच तालुक्यात राजकीय आणि सामाजिक वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.श्रद्धा साखरे, अंकित साखरे आणि भूषण पाटील या तिन्ही नेत्यांच्या उपस्थितीत आणि हस्ते हा भूमिपूजन सोहळा पार पडताच, हा उपक्रम केवळ विकासात्मक न राहता आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर महत्त्वाचा राजकीय संदेश देणारा ठरला आहे.



अनेक वर्षांपासून परखंदेवाडी परिसरातील धनगर समाजाला अहिल्याबाई होळकर यांची जयंती साजरी करण्यासाठी स्वतंत्र जागा नव्हती. हा प्रश्न ओळखून राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) च्या श्रद्धा साखरे, अंकित साखरे आणि भूषण पाटील यांच्या वतीने थेट भूखंड खरेदी करून समाजाच्या हाती हक्काची जागा उपलब्ध करून देण्यात आली. या निर्णयामुळे ग्रामस्थांमध्ये आनंद, उत्साह आणि समाधानाची भावना निर्माण झाली आहे. या भूखंडाच्या भूमिपूजनावेळी बोलताना माजी पंचायत समिती सभापती श्रद्धा साखरे यांनी, "हा भूखंड म्हणजे केवळ जागा नाही, तर समाजाच्या एकजुटीचा आणि सन्मानाचा पाया आहे," असे ठणकावून सांगितले. तसेच महिलांना संघटित करून महिला सक्षमीकरणासाठी विविध योजनांचा लाभ पोहोचवण्याचा निर्धारही त्यांनी यावेळी जाहीर केला. तर राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) चे रायगड जिल्हा युवक अध्यक्ष अंकित साखरे यांनी, "आज भूमिपूजन झाले आहे; उद्या येथे अहिल्याबाई होळकर यांचे भव्य सभागृह उभे राहील. शासनाच्या माध्यमातून निधी आणण्याची जबाबदारी आम्ही घेणार आहोत," असे स्पष्ट करत नेतृत्वाचा आत्मविश्वास दाखवला. तर खानाव पंचायत समिती गणातून निवडणूक लढवणारे भूषण पाटील यांनी, "हा निर्णय केवळ जयंतीपुरता मर्यादित नाही तर पाणी, वीज, रस्ता, आरोग्य यांसारख्या मूलभूत प्रश्नांवरही याच ताकदीने काम केले जाईल," असे सांगत विकासाचा व्यापक अजेंडा जाहीर केला आहे. या कार्यक्रमाला खालापूर पंचायत समितीच्या माजी सभापती तथा राष्ट्रवादी काँग्रेसच्या श्रद्धा साखरे, रायगड जिल्हा युवक अध्यक्ष अंकित साखरे, भूषण पाटील, सामाजिक कार्यकर्ते भगवान ढेबे, मानसी अमर मानकवळे, पत्रकार हनुमंत मोरे, सम्राट लाईव्ह मराठीचे जतीन मोरे, अहिल्यादेवी उत्सव कमिटीचे अध्यक्ष आकाश झोरे, उपाध्यक्ष लक्ष्मण हिरवे, सचिव सुरेश ढेबे यांच्यासह रघुनाथ ढेबे, आनंद हिरवे, गंगाराम झोरे अनेक पदाधिकारी, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संधीसाधूंना ओळखा आणि दूर ठेवा – खारघरमध्ये प्रशांत ठाकूर यांचे आवाहन

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (प्रतिनिधी) :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे सबका साथ, सबका विकास व सबका विश्वास हे व्हिजन घेऊन भारतीय जनता पक्ष महायुती खारघरसह संपूर्ण पनवेल महानगरपालिका क्षेत्रात विकासाची गंगा पोहोचवत आहे. महापालिकेच्या माध्यमातून आरोग्य आणि पायाभूत सुविधांची अनेक कामे मार्गी लागली आहेत. मात्र, ज्यांना केवळ पदे हवी आहेत आणि ज्यांना पदाशिवाय काहीच दिसत नाही, अशा संधीसाधूंनी भाजपची सोडून वेगळी वाट धरली आहे. जनतेची दिशाभूल करणाऱ्या अशा प्रवृत्तींना वेळीच ओळखून त्यांना दूर करा, असे आवाहन आमदार प्रशांत ठाकूर यांनी खारघर येथील प्रभाग क्रमांक ६ मध्ये आयोजित प्रचारा दरम्यान केला.

पनवेल महानगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक ६ मधील महायुतीचे उमेदवार उषा अजित अडसुळे, नरेश गणपत ठाकूर, सोनल अजिंक्य नवघरे आणि समीर श्रीकांत कदम यांच्या प्रचारार्थ शुक्रवारी भव्य रॅली काढण्यात आली होती. यावेळी खासदार धैर्यशील पाटील आणि आमदार प्रशांत ठाकूर यांनी या परिसरात जोरदार शक्तीप्रदर्शन केले. यावेळी आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, भाजपचा कार्यकर्ता



महायुतीच्या विजयासाठी अहोरात्र मेहनत घेत आहे. खारघरचा विकास हा केवळ महायुतीच्या खंबीर पाठबळामुळेच शक्य झाला असून, आगामी काळातही नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी आम्ही पूर्ण ताकदीने तत्पर राहू, अशी ग्वाही त्यांनी दिली. प्रचारात सहभागी झालेले खासदार तथा भाजपचे दक्षिण रायगड जिल्हाध्यक्ष धैर्यशील पाटील यांनीही महायुतीच्या उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहन केले. प्रभाग ६ मधील मतदारांचा मिळणारा उत्स्फूर्त प्रतिसाद पाहता, या ठिकाणी पुन्हा एकदा कमळ फुलण्यासाठी प्रत्येक नागरिक सज्ज झाला असल्याचे चित्र दिसत आहे. या प्रचार दौऱ्यावेळी आमदार विक्रांत पाटील, उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, राष्ट्रवादीचे नेते शिवदास कांबळे यांच्यासह महायुतीचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नवी मुंबईत रचला इतिहास! मेडिकव्हर हॉस्पिटल्समध्ये पार पडली महाराष्ट्रातील पहिली ड्युअल चेंबर लीडलेस पेसमेकर प्रक्रिया

**दैनिक युवक आधार**

**पनवेल (वार्ताहर) :** नवी मुंबईतील मेडिकव्हर हॉस्पिटल्सने ॲबॉटच्या AVEIR™ ड्युअल चेंबर लीडलेस पेसमेकरचा वापर करून नवी मुंबईतील पहिले ड्युअल चेंबर लीडलेस पेसमेकर इम्प्लांटेशन यशस्वीरित्या पार पाडले. डॉ. केशव काळे आणि डॉ. विनिता अरोरा यांनी कार्डिओलॉजी टीम, ॲनेस्थेसिया टीम आणि कॅथ लॅब स्टाफ यांच्या मदतीने ही ऐतिहासिक प्रक्रिया यशस्वीरित्या पार पाडली, ज्यामुळे रुग्णाला जास्तीत जास्त सुरक्षितता आणि आराम मिळाला. आजपर्यंत लीडलेस पेसमेकर फक्त हृदयाच्या एका चेंबरसाठीच वापरले जात होते. पण दोन चेंबरमध्ये अचूक समन्वय साधणे ही एक मोठी वैद्यकीय अडचण होती. ॲबॉटच्या AVEIR™ ड्युअल चेंबर लीडलेस पेसमेकर तंत्रज्ञानाने या समस्येवर प्रभावी उपाय दिला आहे. महाराष्ट्रातील पहिली ड्युअल चेंबर लीडलेस पेसमेकर प्रक्रिया ही नवी मुंबईतील मेडिकव्हर हॉस्पिटल्समध्ये पार पडली आहे.

नवी मुंबईतील बेलापूर येथील ७५ वर्षीय लता सिंग (नाव बदलले आहे) या रुग्णाला कोरोनरी आर्टरी आजाराचा वैद्यकिय इतिहास होता आणि त्यापूर्वी त्यांनी कोरोनरी आर्टरी बायपास ग्राफ्टिंग (CABG) केले होते. कालांतराने, तिच्या प्रकृतीत गंभीर बदल झाला कारण तिला अचानक बेशुध्द पडण्याची समस्या उद्भवू लागली, ज्यामुळे ती आणि तिचे कुटुंब सतत भीतीत वावरू लागले. तिला हृदयविकाराचा झटका आला तेव्हा तिची प्रकृती आणखी बिकट झाली आणि तिची प्रकृती अत्यंत गंभीर झाली. तिचे हृदय अतिशय नाजूक झाले होते. तिच्या या स्थितीची तीव्रता लक्षात घेता, पेसमेकर बसविण्याचा सल्ला देण्यात आला. या रुग्णाला डिमेंशिया, पार्किन्सन रोग, रक्तस्त्राव विकार आणि रक्त पातळ करणाऱ्या औषधांचा दीर्घकालीन वापर यासह अनेक आजार(कोमॉर्बिडीटीज) होते. या परिस्थितींमुळे पारंपारिक पेसमेकर इम्प्लांटेशनशी संबंधित गुंतागुंतीचा धोका वाढला, जसे की संसर्ग, शिसे-संबंधित समस्या आणि शस्त्रक्रिया व इतर गुंतागुंत. काळजीपूर्वक मूल्यांकन आणि चर्चा केल्यानंतर, मेडिकव्हर हॉस्पिटलमधील टीमने निर्णय घेतला की यावर लीडलेस पेसमेकर पद्धत सर्वात सुरक्षित आणि प्रभावी पर्याय ठरेल. नवी मुंबईतील मेडिकव्हर हॉस्पिटल्सचे वरिष्ठ इंटरव्हेंशनल कार्डिओलॉजिस्ट डॉ. केशव काळे म्हणाले, १७ डिसेंबर रोजी रुग्णाला सिंकोपल अटॅक, छातीत दुखणे आणि भान हरपणे यामुळे आपत्कालीन परिस्थितीत रुग्णालयात दाखल करण्यात आले. तिला ताबडतोब आयसीयूमध्ये निरीक्षणाखाली ठेवण्यात आले आणि ट्रान्सक्यूटेनियस पेसमेकर पॅड लावण्यात आले. सतत




हृदयाच्या निरीक्षणामुळे तिच्या हृदयाचे ठोके थांबल्याचे दिसून आले आणि तिला हृदयविकाराचा झटका देखील आला, जो कार्डिओपल्मोनरी रिसुसिटेशन (सीपीआर) ने त्वरित व्यवस्थापित करण्यात आला. होल्टर मॉनिटरिंगसह पुढील मूल्यांकनामुळे दीर्घकाळ हृदयविकाराचे निदान झाले. या रुग्णाची वैद्यकिय स्थिती अतिशय गुंतागुंतीची होती. तिला कोरोनरी आर्टरी डिसीज, बायपास सर्जरी, वारंवार सिन्कोपल एपिसोड्स आणि अगदी हृदयविकाराचा झटका आला होता. तसेच डिमेंशिया, पार्किन्सन रोग, रक्तस्त्राव विकार आणि दीर्घकालीन रक्त पातळ करणाऱ्या औषधांचा वापर यासारख्या अनेक कोमॉर्बिडीटीजचा वैद्यकीय इतिहास होता. अशा परिस्थितीत, पारंपारिक पेसमेकर संसर्ग, रक्तस्त्राव आणि लीड संबंधित गुंतागुंतीमुळे जास्त धोका निर्माण होण्याचा धोका होता. यावर AVEIR™ ड्युअल चेंबर लीडलेस पेसमेकर हा एक सुरक्षित आणि अधिक प्रगत पर्याय आहे. ही जगातील पहिली अशी पेसमेकर सिस्टम आहे, जी कोणत्याही तारांशिवाय किंवा शस्त्रक्रियेने तयार केलेल्या पॉकेटशिवाय कार्य करते आणि दोन लहान उपकरणांदरम्यान बीट-टू-बीट वायरलेस समन्वय साधण्याची क्षमता ठेवते. २६ डिसेंबर रोजी रुग्णाचे पेसमेकर इम्प्लांटेशन करण्याचे ठरले. डॉ. केशव काळे पुढे म्हणाले, "AVEIR™ ड्युअल चेंबर लीडलेस पेसमेकर हा कार्डियाक रिदम मॅनेजमेंटमध्ये खरा गेम-चेंजर ठरला आहे. लीडलेस पेसमेकर ही एक अत्याधुनिक, कमी त्रासदायक आणि जलद पुनर्प्राप्ती देणारी तंत्रज्ञान प्रणाली आहे. ही उपकरणे थेट हृदयाच्या आतील भागात कॅथेटरद्वारे बसवली जातात, ज्यासाठी कोणत्याही बाह्य तारांची आवश्यकता नसते.यामुळे संसर्ग आणि दीर्घकालीन गुंतागुंतीचा धोका कमी होतो. आणखी एक मोठा फायदा म्हणजे त्याची पुनर्प्राप्तीची क्षमता आणि १८ वर्षांहून अधिक काळासाठीची बॅटरी लाइफ. स्थानिक भूल देऊन इम्प्लांटेशन यशस्वीरित्या पूर्ण झाले, ज्यामुळे एक सुरळीत प्रक्रिया आणि अनुकूल क्लिनिकल परिणाम सुनिश्चित झाला. ही प्रक्रिया कोणत्याही गुंतागुंतीशिवाय २-३ तासांच्या कालावधीत सुरळीतपणे पूर्ण झाली. स्थिर पुनर्प्राप्तीनंतर, रुग्णाला ३० डिसेंबर रोजी डिस्चार्ज देण्यात आला आणि आता ती तिच्या दैनंदिन क्रियाकलाप आरामात आणि नवीन आत्मविश्वासाने करू शकते. जर वेळीच उपचार दिले नसते, तर तिला वारंवार हृदयविकाराच्या झटक्यांचा सामना करावा लागला असता, ज्यामुळे तिच्या जीवाला धोका निर्माण झाला असता. तिच्या रुग्णालयात दाखल करण्यापूर्वी काही वेळापुर्वीच हृदयविकाराचा झटका आला होता, ज्यामुळे तिची प्रकृती अतिशय नाजूक झाली होती. तिचा जीव वाचवण्यासाठी त्वरित वैद्यकीय हस्तक्षेप किती महत्त्वाचा होता आणि किती महत्त्वाचा होता. ही प्रक्रिया संदर्भित करते. ही प्रक्रिया कॅथेटरद्वारे केली गेल्यामुळे, कोणत्याही शस्त्रक्रियेच्या चिरा किंवा टाके काढण्याची आवश्यकता भासली नाही. रुग्णाला नियमित पेसमेकर फॉलो-अपचा सल्ला देण्यात आला आहे, ज्यात वर्षातून एकदा नियमित तपासणी करण्याची शिफारस केली आहे. मी वारंवार बेशुद्ध पडत होती आणि मला हृदयविकाराचा झटकाही देखील आला होता. माझ्या सध्याच्या आरोग्य स्थितीमुळे, शस्त्रक्रिया करणे अतिशय गुंतागुंतीचे होते. मेडिकव्हर हॉस्पिटलमधील डॉक्टरांनी मला सर्व काही स्पष्टपणे समजावून सांगितले, ज्यामुळे माझा आत्मविश्वास वाढला. आज, मला मोठ्या शस्त्रक्रियेशिवाय प्रगत उपचार मिळाल्याने नवे आयुष्य मिळाले. मी डॉ. केशव काळे, डॉ. विनीता अरोरा आणि संपूर्ण टीमची आभारी आहे अशी प्रतिक्रिया रुग्ण लता सिंह (नाव बदललेले) यांनी व्यक्त केली. नवी मुंबई आणि कोकण विभागासाठी ही एक ऐतिहासिक कामगिरी ठरली आहे. AVEIR™ ड्युअल चेंबर लीडलेस पेसमेकर यशस्वीपणे प्रत्यारोपित करून मेडिकव्हर हॉस्पिटल्सने हृदयविकार उपचारांच्या क्षेत्रात नवे मापदंड निर्माण केले आहेत. यामुळे रुग्णांची सुरक्षितता आणि दर्जेदार आरोग्यसेवा देण्यावर उद्दिष्ट पूर्ण झाले आहे, *अशी प्रतिक्रिया मेडिकव्हर हॉस्पिटल्सचे केंद्र प्रमुख संदीप जोशी यांनी व्यक्त केली.

## श्री.गोकुळ (बापू) टांकसाळे यांना पत्रकारदिनानिमित्त सन्मानपत्र

**दैनिक युवक आधार**

**सणसर /विकास क्षत्रिय :** इंदापूर बारामती तालुक्याचे दैनिक प्रभातचे वार्ताहर व काटेवाडी गावचे सुपुत्र मा गोकुळ टाकंसाळे यांना जनजागृती सेवा संस्था बदलापूर मुंबई यांच्या वतीने मराठी पत्रकारितेचे जनक दर्पणकार आचार्य बाळशात्री जांभेकर यांच्या जयंती व पत्रकार दिनानिमित्त निर्भीड पत्रकार सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.हे 'सन्मानपत्र' देत लोकशाहीच्या या चौथ्या स्तंभाचे घटक असून या संगणकीय युगात आपण दैनिकातून समाजजागृती



करण्याचे मोठे कार्य करत असल्यामुळे हे निश्चितच कौतुकास्पद असून आपल्या सेवाभावी सत्कार्याची दखल घेऊन पत्रकारितेतील जनसेवेचे व्रत घेतलेल्या गोकुळ टांकसाळे सारख्या पत्रकारांच्या लेखणीला आणखी बलशाली करण्याच्या उदात्त हेतुनेच हा यथोचित सन्मान करण्यात आला आहे.असं मत जनजागृती सेवा संस्थेचे संस्थापक अध्यक्ष गुरुनाथ तिरपणकर व सचिव संचिता भंडारी यांनी सन्मानपत्र देताना सांगितले

मा गोकुळ टांकसाळे यांना सन्मानपत्र मिळाल्यानंतर काटेवाडी येथील पंचायतराज अभियानात राज्यसभेच्या खासदार सुनेत्रा वाहिनी पवार श्री छत्रपती कारखान्याचे चेअरमन पृथ्वीराज बापू जाचक तसेच काटेवाडी भवानीनगर येथील ग्रामस्थ यांनी कौतुक करून अभिनंदन करण्यात येऊन पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या.

## स्ट्रेट लाईट वरील बंद असलेले तिरंगा लाईट प्रजासत्ताक दिना अगोदर चालू करण्यात यावे

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी, शेगांव :** शहरात माघील कित्तेक दिवसा पासून स्ट्रेट लाईट वरील तिरंगा लाईट बंद आहेत. मोठ्या थाटा माटात हे तिरंगा लाईट शहराची शोभा वाढवी व राष्ट्र भावना जागृत राहावी करीता स्ट्रेट लाईट वरती तिरंगा लाईट लावण्यात आले होते. परंतु काही दिवसा पासून हे तिरंगा लाईट बंद आहेत. असे दिसून येते शहरातील नागरिकांचे राष्ट्र भावना जागृत ठेवण्याचे काम हे तिरंगा लाईट सातत्याने करीत होते. परंतु नगर परिषदेने



योग्य व्यवस्थापन न केल्याने मागील काही दिवसा पासून हे तिरंगा लाईट बंद आहेत. तर काही बंद चालू होत आहेत . या मुळे शहरात नागरिकांचे राष्ट्र भावना दुखावल्या जात असल्याचे प्रतिपादन स्वराज्य पक्षाचे नेते गोपाल तायडे यांनी केले आहे.

भारत देश आपला 77 वा प्रजासत्ताक दिन साजरा करणार असून शहराच्या सुशोभीकरणात व राष्ट्र भावना जागृत ठेवण्या करीता मोलाचे भर टाकणारे तिरंगा लाईट परत चालू करण्यात यावे व तिरंगा लाईट बंद न राहण्याचे योग्य व्यवस्थापन मेंटेनेस ठेवण्यात यावे. 26 जानेवारी प्रजासत्ता दिना अगोदर तिरंगा लाईट चालू न केल्यास आक्रमक आंदोलन करू असा इशारा त्याच्या कडून देण्यात आला आहे.

## उरणची आंतरराष्ट्रीय नेमबाज सुवर्ण कन्याने पटकावले दोन टीम सुवर्ण व दोन वैयक्तिक दोन कांस्यपदक

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल/वार्ताहर :** 16 डिसेंबर 2025 ते 5 जानेवारी 2026 दरम्यान डॉ. कर्णिसिंग शूटिंग रेंग दिल्ली येथे झालेल्या 68 व्या राष्ट्रीय शॉटगन डबल ट्रॅप ज्युनिअर वुमन टीम व यूथ वुमन टीम मध्ये सुवर्ण पदक व वैयक्तिक ज्यू अँड युथ मध्ये कांस्य पदक मिळवले तसेच कार्तिकी देवळेकर व वरा देवळेकर यांनी स्पर्धेत महाराष्ट्र संघाचे प्रतिनिधित्व करत विख्यात नेमबाज रिनॉल्ड शूटर ही पदवी संपादन केली.

तिघी जणी सिद्धांत रायफल क्लबच्या मेंबर आहेत. त्यांचे प्रशिक्षक रॅलस्टॅन कोईलो यांच्याकडे अवनी कोळी प्रशिक्षण घेत आहे व कार्तिकी आणि वरा ह्या बहिणी मोहणिश हिरवे यांच्याकडे नेमबाजीचे प्रशिक्षण बालेवाडी येथील शूटिंग रेंज वर घेत असतात. त्यांच्या या यशाबद्दल



क्लबचे अध्यक्ष विजय खारकर, सचिव प्रशिक्षक राष्ट्रीय नेमबाजी किशन खारके, प्रीतम पाटील, महेश फुलोरे, नगरसेवक अंबरनाथ, अजिंक्य चौधरी काटई, समाधान घोपरकर, किरण माळी, अविनाश भगत, सूरज थले, किरण मोहिते, प्रशिक्षक अलंकार कोळी, राजु मुंबईकर मित्र परिवार यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

# सत्य लिहिणे गुन्हा ठरतोय का?

## वाशिममध्ये पत्रकाराला जीवे मारण्याची थेट धमकी; लोकशाहीवर उघड हल्ला

**दैनिक युवक आधार**

**करण धोंगडे वाशीम जिल्हा प्रतिनिधी :** लोकशाहीचा चौथा स्तंभ असलेल्या पत्रकारितेचा आवाज दाबण्यासाठी दहशतीचा वापर सुरू झाल्याचा अत्यंत गंभीर आणि धक्कादायक प्रकार वाशिम जिल्ह्यात उघडकीस आला आहे. सत्य बातम्या प्रसिद्ध करून शासकीय व निमशासकीय कामांतील अनियमितता उघड करणाऱ्या पत्रकाराला थेट जीवे मारण्याची धमकी देण्यात आल्याने संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली आहे. हा प्रकार म्हणजे केवळ एका पत्रकारावर झालेला हल्ला नसून, तो लोकशाही, अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि जनतेच्या माहितीच्या अधिकारावर केलेला उघड आघात आहे.

दैनिक 'चालू वार्ता'चे वाशिम जिल्हा प्रतिनिधी प्राताप नारायण नागरे हे आपल्या सहकाऱ्यासह वाशिम शहर परिसरात सुरू असलेल्या सोलार सब-स्टेशन व विद्युत लाईन उभारणीच्या कामांचे छायाचित्रण करत असताना, दोन अज्ञात इसमांनी त्यांना अडवले."फोटोग्राफी थांबवा, नाहीतर जिवंत सोडणार नाही","पुन्हा बातमी केली किंवा पोलीस तक्रार दिली, तर तुमच्यासह कुटुंबालाही परिणाम भोगावा लागेल"अशा भाषेत उघडपणे




जीवे मारण्याची धमकी देत दहशत निर्माण करण्यात आली.

**दहशतीतून सत्य दाबण्याचा प्रयत्न**

सदर प्रकरणातून स्पष्ट होते की, जनहिताची माहिती बाहेर येऊ नये म्हणून पत्रकारांना घाबरवण्याचा, धमकावण्याचा आणि गप्प बसवण्याचा प्रयत्न केला जात आहे. हा प्रकार म्हणजे पत्रकार संरक्षण कायद्याची थट्टा असून, गुन्हेगारांना अभय दिले जात असल्याचा संशयही व्यक्त होत आहे.

**पोलीस अधीक्षकांकडे थेट तक्रार**

या गंभीर घटनेनंतर पत्रकार प्राताप नागरे यांनी वाशिम पोलीस अधीक्षक कार्यालयात लेखी तक्रार दाखल केली असून, संबंधित अज्ञात इसमांविरोधात तात्काळ गुन्हा दाखल करून अटक करण्याची मागणी करण्यात आली आहे. तक्रारीची नोंद घेण्यात आली असली, तरी अद्याप कठोर कारवाई न झाल्यास पत्रकारांमध्ये असंतोष वाढण्याची शक्यता आहे.

**प्रशासन व शासनाची अग्निपरीक्षा**

या घटनेमुळे वाशिम जिल्ह्यातील पत्रकारांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. आज जर सत्य लिहिणाऱ्या पत्रकाराला संरक्षण मिळाले नाही, तर उद्या भ्रष्टाचार, निकृष्ट कामे आणि गैरव्यवहार उघडकीस आणणारा कोणीही राहणार नाही, असा संतप्त सूर पत्रकार संघटनांकडून व्यक्त होत आहे. त्यामुळे प्रशासन व शासनाची ही अग्निपरीक्षा असल्याचे बोलले जात आहे.

**कठोर कारवाई नाही तर आंदोलनाचा इशारा**

दोषींना तात्काळ अटक करून पत्रकारांना प्रभावी संरक्षण देण्यात यावे, अन्यथा हा प्रकार राज्यातील पत्रकारांसाठी धोक्याचा इशारा ठरेल, असा स्पष्ट इशारा पत्रकार व सामाजिक संघटनांकडून देण्यात आला आहे. गरज पडल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

**पत्रकार सुरक्षेचा गंभीर मुद्दा**

१)सत्य लिहिणाऱ्या पत्रकाराला जीवे मारण्याची धमकी

२)लोकशाही व अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर थेट हल्ला

३)पत्रकार संरक्षण कायद्याची उघड पायमल्ली

४)दोषींना तात्काळ अटक न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा

५)पत्रकारांना संरक्षण देणे ही शासनाची जबाबदारी

## स्मृती सप्ताहाला श्री शिवाजी विद्यालय रिसोड येथे उत्साहात प्रारंभ!

**दैनिक युवक आधार**

**रिसोड (प्रतिनिधी)/ रणजितसिंह. ठाकुर :** खेळामध्ये हार जीतला महत्त्व नसून सहभाग अत्यंत महत्त्वाचा असतो, खेळातील सहभागाने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळते असे प्रतिपादन अमरावती विभागाचे शिक्षक आमदार ॲड.किरणराव सरनाईक यांनी स्थानिक श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय रिसोड येथे स्वर्गीय शिक्षण महर्षि ॲड.आप्पासाहेब सरनाईक स्मृती सप्ताहाच्या उद्घाटन प्रसंगी बोलत असताना केले.

11 जानेवारी रोजी आप्पासाहेब सरनाईक यांचा स्मृतिदिन असतो त्यानिमित्ताने श्री शिवाजी शिक्षण संस्था वाशीम अंतर्गत येत असलेल्या सर्वच शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये दरवर्षी स्मृती सप्ताहाचे आयोजन करण्यात येते. त्यानिमित्ताने आयोजित स्मृती सप्ताहाच्या उद्घाटनासाठी प्रमुख अतिथी म्हणून शिक्षक आमदार ॲड.किरणराव सरनाईक



हे उपस्थित होते. यावेळी सर्वप्रथम शिक्षण महर्षि स्वर्गीय ॲड.आप्पासाहेब सरनाईक यांच्या प्रतिमेचे पूजन करून सप्ताहाची सुरुवात करण्यात आली. यावेळी शाळा व कनिष्ठ महाविद्यालयाच्या वतीने शिक्षक आमदार

ॲड. किरणराव सरनाईक यांचा सत्कार करण्यात आला. त्यानंतर पुढे बोलताना आमदार सरनाईक म्हणाले की शालेय जीवनामध्ये शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांमध्ये असणाऱ्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी अशा प्रकारच्या सांस्कृतिक व क्रीडा कार्यक्रमाचे आयोजन होणे अनिवार्य असते. आप्पासाहेब सरनाईक स्मृती सप्ताहाच्या निमित्ताने श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय रिसोड येथे विविध सांस्कृतिक कार्यक्रम व क्रीडा स्पर्धांचे आयोजन केल्याबद्दल त्यांनी प्राचार्य संजय देशमुख यांचे कौतुक केले व त्याचबरोबर या क्रीडा स्पर्धेदरम्यान विद्यार्थ्यांना कोणतीही इजा होणार नाही याची विशेष काळजी घेण्याचेही सूचित केले. या सप्ताहाच्या निमित्ताने निबंध स्पर्धा, हस्ताक्षर स्पर्धा, खो-खो, कबड्डी, रांगोळी स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, वादविवाद स्पर्धा व डान्स स्पर्धा अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाचे संचालन दिगंबर पाचारणे यांनी केले तर आभार क्रीडा शिक्षक विनोद बावणे यांनी मांडले.

# आज अनसिंग येथील श्रीमद भागवत सप्ताहाची सांगता

## ह.भ.प.वात्स्ल्यमुर्ती माधव बाबा इंगोले यांचे काल्याचे किर्तन; आज साई मंदिरात महाप्रसादाचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम/ गजानन पवार पाटील :** श्री साई संस्थान चॅरीटेबल ट्रस्टच्यावतीने साईमंदिरात ४ जानेवारी ते ११ जानेवारी २०२५ पर्यंत श्रीमद भागवत सप्ताहाचे व श्री साई चरित्र पारायणाचे आयोजन करण्यात आले.आज रविवार ११ जानेवारी रोजी सकाळी ९ वाजता आळंदी येथील ह.भ.प.वात्स्ल्यमुर्ती माधव बाबा इंगोले यांचे काल्याचे किर्तन होणार आहे.त्यानंतर महाप्रसादानंतर या भागवत सप्ताहाची सांगता होणार आहे. दरवर्षीप्रमाणे यावर्षीसुद्धा अनसिंग येथील श्री साई मंदिरात श्रीमद भागवत सप्ताहाचे आयोजन करण्यात आले.४ जानेवारी रोजी सकाळी ८ वाजता श्री साईबाबा व संत अच्युतबाबा यांच्या पादुकांची सुशोभीत रथामध्ये अनसिंग नगरीत नगर प्रदक्षिणा करण्यात आली. या सप्ताहामध्ये दररोज पहाटे ५ ते ६ वाजेपर्यंत काकडा,सकाळी ८ ते १० पर्यंत श्री साईचरित्र पारायण,दुपारी एक ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत हरिपाठ आणि रात्री ८ ते १० वाजेपर्यंत हरिकिर्तनाचे आयोजन करण्यात आले.या सप्ताहामध्ये भागवत कथा प्रवक्ते म्हणून ह.भ.प.प्रेममुर्ती संतोष ठाकरे ,पुरोहित म्हणून सुशांत गुरू कौंडीण्य तर श्री साई चरित्र पारायण प्रवक्ते म्हणून ह.भ.प.गजानन महाराज भड यांची उपस्थिती लाभली.

या भागवत कथा सप्ताहाचे प्रमुख आकर्षण आळंदी देवाची येथील श्री. गजानन महाराज वारकरी शिक्षण संस्थेचे विद्यार्थी ठरले. ४ जानेवारी रोजी रात्री ८वाजता किर्तनकार ह.भ.प. वेदांताचार्य




कैलास येवले आळंदीकर,५ जानेवारी रोजी ह.भ.प.विनोद वैभव शिवा बावरकर,६ जानेवारी रोजी ह.भ.प.विठ्ठल महाराज कापसे,७ जानेवारी रोजी ह.भ.प.गौपुत्र विदर्भ वैभव संजय पाचपोर ,८ जानेवारी रोजी भावरसिक मंगेश गावंडे, ९ जानेवारी रोजी ह.भ.प.अविनाश भारती महाराज, आणि१० जानेवारी रोजी ह.भ.प. अजय महाराज महाजन यांचे किर्तन मोठ्या उत्साहात पार पडले.या किर्तनाचा पंचक्रोशीतील हजारो भाविकांनी लाभ घेतला.या भागवत सप्ताहात काकडा च्या वेळी सखाराम सावके,अरूण लांडगे,बाबुराव वाबळे, प्रफुल्ल ठोंबे,विठ्ठल ढगे, रूषीकेश लांडगे यांनी सहभाग घेतला. तर किर्तन व हरिपाठामध्ये ह.भ.प.विठ्ठल महाराज कापसे व त्यांच्या आळंदी येथील श्री गजानन महाराज वारकरी शिक्षण संस्थेच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. किर्तनाची साथ गायनाचार्य ह.भ,प. भागवत मारकड,ह.भ.प.भिमाशंकर दहीफळे,ह.भ.प. अमोल महाराज माळेकर यांनी तर मृदुंगाचार्य म्हणून याह.भ.प. विशाल महाराज शिंदे यांनी साथ दिली.या भागवत सप्ताहात अनसिंग पंचक्रोशीतील अनसिंग,खडसिंग,देगांव,एकांबा,सापळी ,जवळा,उमरा कापसे,उमरा मोठा,शेलु बुद्रुक,शेलु खुर्द,उमराळा,सोंडा,पिंपळगाव,ब्रम्हा,वाई,वारला,ढिल्ली,घोटा,साव ळी,पन्हाळा,निंबाळवाडी,टणका,जयपूर, चिंचखेडा,नांदगाव,शिवणी येथील भजनी मंडळीने साथ देवून या भागवत सप्ताहाची शोभा वाढविली.

रविवार ११ जानेवारी रोजी सकाळी ९ ते ११ वाजेपर्यंत ह.भ.प.वात्स्ल्यमुर्ती माधव बाबा इंगोले यांचे काल्याचे किर्तन झाल्यानंतर महाप्रसादाच्या कार्यक्रमाने या भागवत सप्ताहाची सांगता होणार आहे. या महाप्रसादाचा परिसरातील भाविकांनी लाभ घेण्याचे आवाहन श्री साई संस्थानचे अध्यक्ष राजु शृंगारे,उपाध्यक्ष विलास ठाकूर,सचिव चंद्रकांत देवळे,सहसचिव नंदकिशोर गावंडे,कोषाध्यक्ष कुंडलिक भोयर,विश्वस्त दीपक निंबेकर,ज्ञानबा पुंड,गजेंद्र देवळे,संजय जवंजाळे यांनी केले आहे.

## पनवेल महानगरपालिका निवडणूक : प्रभाग क्रमांक १४ मधून सतीश पाटील निवडणूक रिंगणात

**दैनिक युवक आधार**

**मच्छिंद्र पाटील/ पनवेल प्रतिनिधी :** पनवेल महानगरपालिका निवडणुकीत प्रभाग क्रमांक १४ मधून महाविकास आघाडीचे उमेदवार श्री. सतीश पाटील यांनी अधिकृतपणे निवडणूक रिंगणात असून. सध्या ते जोरदार प्रचार करत नागरिकांशी थेट संवाद साधत घराघरांत भेटी देत आहेत.

प्रचारादरम्यान नागरिकांच्या समस्या समजून घेत निवडून आल्यानंतर समस्या प्राधान्याने सोडवण्याची ग्वाही सतीश पाटील यांनी दिली आहे.



मतदारांसमोर विकासाचा स्पष्ट वचननामा मांडत गावातील पाणी, रस्ते, स्वच्छता, नागरी सुविधा अशा विविध समस्यांकडे लक्ष वेधले जात आहे.

तसेच परिसरात समाजमंदिर उभारण्यासाठी ठोस प्रयत्न करून समाजमंदिर बांधण्यात येईल, असा विश्वासही त्यांनी मतदारांना दिला.

निवडून आल्यानंतर सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांना न्याय देण्यावर विशेष भर देण्यात येईल, असे मत त्यांनी पत्रकारांशी बोलताना व्यक्त केले.यावेळी त्यांनी मतदारांना आवाहन करत कमळावर बटन दाबून आम्हाला विजयी करा, असे आवाहन केले.

# पोलीस वर्धापन दिनाचे औचित्य साधून चिखले येथील शालेय विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

**दैनिक युवक आधार**

**पनवेल वार्ताहर :** पोलीस वर्धापन दिनाचे औचित्य साधून रेझिंग डे सप्ताह साजरा करण्यात येत आहे. त्या अनुषंगाने श्री प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळा, चिखले तालुका पनवेल येथील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

पनवेल तालुका पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन घाडगे यांच्या



मार्गदर्शनाखाली श्री प्राथमिक , माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळा, चिखले यथील विद्यार्थ्यांना तालुका पनवेल तालुका पोलीस ठाणे येथे आणून पोलीस ठाणे कडील हत्यार, पोलिसांचे दैनंदिन कार्यालयीन कामकाज याची माहिती दिलेली आहे. तसेच सायबर गुन्हे , नशा मुक्ती संदर्भात योग्य ते मार्गदर्शन करून, अंमली पदार्थाचे सेवन व त्यापासून होणारे दुष्परिणाम, वाहतुकीचे नियम, याबाबत अवगत केले. सायबर हेल्पलाइन नंबर 1930 व तात्काळ पोलीस मदतीकरिता डायल 112, या संदर्भात माहिती दिली तसेच लहान मुलांच्या सुरक्षेच्या अनुषंगाने महत्त्वाच्या सूचना देऊन विद्यार्थ्यांसाठी अल्पउपहाराची व्यवस्था करण्यात आली होती. सदर वेळी शाळेचे 03 शिक्षक व 50 विद्यार्थी तसेच हद्दीतील 35 नागरिक उपस्थित होते.

# राष्ट्रीय सुरक्षा अभियान २०२६ अंतर्गत आजिवली येथे चित्रकला व रांगोळी स्पर्धेचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**पनवेल प्रतिनिधी :** श्री स्वामी विवेकानंद शैक्षणिक संस्था संचलित जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यामंदिर, आजिवली (ता. पनवेल, जि. रायगड) येथे राष्ट्रीय सुरक्षा अभियान २०२६ अंतर्गत विद्यार्थ्यांसाठी चित्रकला व रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

या स्पर्धेत इयत्ता माध्यमिक व उच्च माध्यमिक स्तरावरील सुमारे ५० ते ६० विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.




राष्ट्रीय सुरक्षा, वाहतूक नियम, सामाजिक जबाबदारी व देशभक्ती या विषयांवर आधारित विद्यार्थ्यांनी साकारलेली चित्रे व रांगोळ्या लक्षवेधी ठरल्या. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व विषयाची समज दर्शविणाऱ्या सादरीकरणामुळे उपस्थितांची विशेष दाद मिळाली.

सदर स्पर्धेसाठी पनवेल वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. प्रकाश सपकाळ हे निरीक्षक म्हणून उपस्थित होते. त्यांच्या समवेत पोलीस उपनिरीक्षक श्री. शशिकांत पवार, पोलीस हवालदार श्री. संजय गावडे, पोलीस कर्मचारी श्री. ज्ञानेश्वर वाघ, पोलीस शिपाई श्री. योगेश जाधव व चालक श्री. श्रेयस जाधव हे अंमलदार उपस्थित होते.

यावेळी विद्यार्थ्यांना राष्ट्रीय सुरक्षा, वाहतूक नियमांचे पालन व नागरिकांची जबाबदारी याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक जाणीव व राष्ट्रप्रेमाची भावना वृद्धिंगत होत असल्याचे मत उपस्थित अधिकाऱ्यांनी व्यक्त केले.

## पुणे येथील एकदिवसीय अधिवेशनात समाधान कांबळे यांना उत्कृष्ट पत्रकार म्हणून सन्मानित

**दैनिक युवक आधार**

**माहूर प्रतिनिधी सय्यद इसा :** समाजातील प्रत्येक घटकांच्या न्याय हक्कासाठी सदैव तत्पर असलेल्या निर्भय व युवा ग्रामीण पत्रकार संघ एक दिवसीय अधिवेशन व पुरस्कार वितरण सोहळा पुणे येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन येथे विविध मान्यवरांच्या उपस्थितीत उत्साहात संपन्न झाला.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून श्री गणेश




कचकलवार राष्ट्रीय अध्यक्ष निर्भय व युवा ग्रामीण पत्रकार संघ, उद्घाटक म्हणून श्री तानाजीभाऊ जाधव टायगर ग्रुप अध्यक्ष, तसेच श्री कॅप्टन परिमल फुलसुंगे, श्री एस पी राठोड, श्री प्रेममूर्ती नवनाथ लिमण, आंतरराष्ट्रीय कीर्तनकार, शिवव्याख्याते - ह.भ. प. यशवंत महाराज फाले, महाकाल भक्त उज्जैन श्रीमहंत डॉ. श्रीकांतदास धुमाळ महाराज (दादासाहेब फाळके पुरस्कार प्राप्त), न्यू होम मिनिस्टर प्रस्तुत क्रांतीनाना मळेगावकर इत्यादी प्रमुखांच्या उपस्थितीत युवा ग्रामीण पत्रकार संघाचे माहूर तालुका उपाध्यक्ष समाधान कांबळे यांना उत्कृष्ट पत्रकार म्हणून सन्मानित करण्यात आले, तसेच समाधान कांबळे यांना अनेक स्तरावरून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

## तालुकास्तरीय प्रश्नमंजुषा स्पर्धेत दुधा शाळेचा प्रथम क्रमांक



**दैनिक युवक आधार**

**उपसंपादक महाराष्ट्र / राजू शिंदे :** विद्यार्थ्याच्या सर्वांगीण विकासाकरिता स्पर्धा परीक्षा एक माध्यम आहे याच माध्यमातून जिल्हा परिषद जालना च्या वतीने घेण्यात आलेल्या तालुकास्तरीय प्रश्नमंजुषा स्पर्धेमध्ये उच्च प्राथमिक गटामध्ये विचारलेल्या प्रश्नांची अचूक उत्तरे देऊन जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा दुधा केंद्र किर्ला तालुका मंठा जिल्हा जालना शाळेच्या विद्यार्थ्यांनी पटकाविला प्रथम क्रमांक .या उच्च प्राथमिक गटामध्ये सार्थक रामेश्वर खुळे,

भाग्यश्री गोकुळ शिंदे व स्नेहल संजय जाधव या वर्ग 8 वी तील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.तसेच प्राथमिक गटामध्ये तालुकास्तरावर सहभागी विद्यार्थी अंजली अविनाश जाधव ,अनिकेत भागवत देशमुख व अमर सतीश खुळे या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या विद्यार्थ्यांना मुख्याध्यापक श्री विजय कांगणे सर सहाय्यक शिक्षक श्री निलेश पिसे सर श्री पंजाब दांदडे सर यांनी मार्गदर्शन केले. या सर्व विद्यार्थ्यांचे व शाळेचे शाळा व्यवस्थापन समिती दुधा, ग्रामपंचायत कार्यालय दुधा ,व पालकांच्या वतीने अभिनंदन करण्यात आले.

# संविधान वाचविण्याची गरज : जयंत पाटील

## राजाभाऊच जिल्हा परिषद लढविणार : महेंद्रशेठ घरत

**दैनिक युवक आधार**

**उलवे, प्रतिनिधी :** "संविधान वाचविण्यासाठी सर्वांनी एकत्र येणे गरजेचे आहे. संविधानावर सध्या घाला घातला जात आहे. देशाचे राजकारण चुकीच्या दिशेने सुरू आहे. राजाभाऊंमध्ये नम्रता आहे. दिवंगत मधुकर ठाकूर हे टक्केवारीत कधी अडकले नाहीत. त्यांचा वारसा चालविण्यासाठी निश्चितच राजाभाऊ योग्य आहेत. त्यामुळे त्यांचा राजकीय प्रवास सुसह्य करण्यासाठी येथील नागरिकांची साथ महत्त्वाची आहे. निर्णय येथील जनतेने आणि ठाकूर परिवाराने घ्यायचा आहे. मी दिलेला शब्द पाळणार. निवडणुकीत कुठलाही दगाफटका होणार नाही, याची काळजी घेण्याची जबाबदारी महाविकास आघाडी म्हणून आपणा सर्वांची आहे," असे शेकापचे ज्येष्ठ नेते जयंत पाटील अलिबाग-चोंढी येथे म्हणाले. राजाभाऊ मधुकर




ठाकूर यांचा शुक्रवारी (या. ९) वाढदिवस सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि कॉंग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

"दिवंगत मधुकर ठाकूर यांचे कार्य अलिबाग परिसराला पूर्ण परिचित आहे. त्यांनी आमदार म्हणून निश्चितच आपल्या कामाने आणि स्वभावाने चांगला ठसा उमटविला आहे. समाजसेवा हाच मधुकर ठाकूर परिवाराचा पिंड आहे. त्यामुळे मधुकर ठाकूर यांचा राजकीय आणि सामाजिक वारसा खऱ्या अर्थाने पुढे चालविण्यासाठी राजाभाऊ यांनी जिल्हा परिषदेतून आपला श्रीगणेशा सुरू करावा. जिल्हा परिषदेसाठी महाविकास आघाडीचे उमेदवार तेच राहतील. त्यांनी जिल्हा परिषद निवडणूक लढवावी, ही अनेक जुन्याजाणत्या कार्यकर्त्यांचीही मागणी आहे. त्यामुळे राजाभाऊच जिल्हा परिषद लढविणार," असे आंतरराष्ट्रीय कामगार नेते आणि कॉंग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत अलिबाग-चोंढी येथे म्हणाले.

यावेळी सत्काराला उत्तर देताना राजाभाऊ ठाकूर म्हणाले, "पप्पांचे काम अलिबागच्या जनतेला माहिती आहे. सामाजिक वसा त्यांनी घेतला होता, तोच पुढे नेण्यासाठी आपण प्रयत्न करणार आहोत. दिबांचे नाव आंतरराष्ट्रीय विमानतळाला लागलेच पाहिजे, यासाठी आपण रस्त्यावर उतरायला तयार आहोत. अलिबागच्या वाहतूक कोंडीवर मार्ग काढण्याची गरज आहे. आपण लढायला तयार आहोत, ठाकूर कुटुंबावर येथील जनतेने नेहमीच प्रेम केले आहे, ते यापुढे भक्कम साथ देतील," असा आशावादही त्यांनी व्यक्त केला.

यावेळी सुनील थळे, समीर ठाकूर, प्रशांत नाईक, आल्हाद पाटील, सुनील घरत, रवींद्र ठाकूर, भास्कर चव्हाण, आकाश राणे आदी पदाधिकारी उपस्थित होते. राजाभाऊ ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त जयंत पाटील, महेंद्रशेठ घरत यांच्या प्रमुख उपस्थितीत भव्य सत्कार करण्यात आला. यावेळी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.